पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ३४ ● रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

विद्या विनयेन शोभते, विनम्रता हाच विद्यार्थ्यांचा दागिना आहे.

09 ऑगस्ट 2026 सायं 6 से रात्रि 10 बजे तक
18 वां श्री श्याम एकादशी संकीर्तन
शहर में पहली बार ऐतिहासिक महाभारत देखावा
पावन सानिध्य श्री श्याम सिंह जी चौहान निज मंदिर पुजारी, खाटूधाम
हारे म्यूजिकल ग्रुप (अकोला)
गोपाल शर्मा हारे, अकोला, मुंबई | ऋषिका ठाकुर, ग्वालियर
आयोजक : श्री स्वार्थी श्याम परिवार, अकोला
निवेदक : गोपाल शर्मा हारे पदयात्री मित्र परिवार, अकोला
सह आयोजक : श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा सेवा समिति, अकोला, महाराष्ट्र
शुभ स्थल : श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा मंदिर गीता नगर, अकोला

## »थोडक्यात

### नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार बापूसाहेब देशमुख यांचे निधन



**अमरावती :** कर्मयोगी श्री. संत गाडगेबाबांच्या सेवा, त्याग आणि निष्काम कर्मयोगाचा वसा व वारसा जपणारे, श्री गाडगे महाराज मिशन, मुंबईचे उपाध्यक्ष तथा संत गाडगे बाबांच्या संकल्पनेतील नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार, सेवाव्रती बापूसाहेब देशमुख यांचे शनिवार, ८ ऑगस्टला रात्री निधन झाले. गरजू, वंचित, दुःखी आणि निराधारांच्या सेवेसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. बापूसाहेब देशमुख यांची अंतिम यात्रा रविवारी सायंकाळी ४ वाजता श्री. गाडगे महाराज गोरक्षण संस्था, मूर्तिजापूर येथून निघणार आहे.

---

### समाजासाठी जीव देऊ शकतो: जरांगे पाटील

माढा : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा सध्या पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू आहे. मराठवाड्यात कुणबी समाजाची ४ प्रमाणपत्रे रद्द झाल्याचे समोर आल्यानंतर जरांगे पाटील कमालीचे आक्रमक झाले आहेत. मी समाजासाठी उपोषण करून जीव देऊ शकतो तशी वेळ पडली तर कोणाचा जीव घेऊही शकतो. मला त्या वाटेवर नेऊ नका,' असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

# जेन - झीं ना हलक्यात घेऊ नका!

## राजकीय पक्ष लागले आहे कामाला

वृत्तसंस्था | ९ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** देशाच्या राजकारणात आता एका नव्या आणि प्रभावी शक्तीचा उदय झाला आहे. आगामी २०२७ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये तरुणाई म्हणजेच 'जेन-झी' मतदार अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक भूमिका बजावणार आहेत. या बदलाची चाहूल लागताच भारतीय जनता पक्ष (भाजप), काँग्रेस आणि समाजवादी पक्ष (सपा) यांसारख्या प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या पारंपरिक रणनीतींमध्ये आमूलाग्र बदल करण्यास सुरुवात केली आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, यापूर्वी निवडणुकीत महिला, मागासवर्गीय, शेतकरी आणि दलित हे पारंपारिक मतदारसंघ महत्त्वाचे मानले जायचे. मात्र आता त्यात १८ ते २९ वयोगटातील 'जेन-झी' या नव्या वर्गाची भक्कम भर पडली आहे. जुलै महिन्यात दिल्लीत झालेल्या जेन-झी आंदोलनाने देशाचे लक्ष वेधून घेतले आणि तरुणांच्या संघटित ताकदीची जाणीव राजकीय पक्षांना करून दिली.बिहारमधील बांकीपूर आणि मध्य प्रदेशातील दतिया येथील पोटनिवडणुकीच्या धक्कादायक निकालांनी हे सिद्ध केले की तरुण मतदार जुन्या जातीय गणितांना छेद देऊन वेगळा निर्णय घेऊ शकतात.



### ५ टक्के मतांचा फरक, २५७ जागांचे गणित

पुढील वर्षी उत्तर प्रदेश, गुजरात, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, मणिपूर आणि गोवा या ७ राज्यांमध्ये निवडणुका होत आहेत. या सर्व राज्यांमध्ये सुमारे २२ टक्के मतदार जेन-झी आहेत. मागील निवडणुकीची आकडेवारी पाहिल्यास, या ७ राज्यांमधील एकूण ९४० जागांपैकी २५७ जागांवर (सुमारे २७ टक्के) विजयाचे अंतर ५ टक्के किंवा त्याहून कमी होते. उत्तर प्रदेशात ४०३ पैकी १३१, गुजरातमध्ये १८२ पैकी २७, पंजाबमध्ये ११७ पैकी २४, उत्तराखंडमध्ये ७० पैकी १५ आणि हिमाचलमध्ये ६८ पैकी १४ जागांवर मताधिक्य ५ टक्के पेक्षा कमी होते. जर २२ टक्के जेन-झी मतदारांपैकी केवळ ५ टक्के मतदार जरी एकवटून एखाद्या पक्षाच्या बाजूने गेले, तर सत्तापालट होऊ शकतो.

### नुसते जाहीरनामे नको, ठोस सांगा

केवळ जाहीरनाम्यात आश्वासने न देता भाषणांमधून रोजगाराचे ठोस नियोजन मांडावे लागेल. बेरोजगारी भत्त्यापेक्षा कौशल्य विकास, शिक्षण आणि डिजिटल इकोसिस्टमवर भर देणाऱ्या पक्षालाच तरुणांची साथ मिळेल. तरुण वर्ग जात-पातींच्या चौकटीतून बाहेर पडत आहे. त्यामुळे पक्षांना 'सेल्फ-मेड'तरुण उमेदवारांना अधिक तिकिटे द्यावी लागतील. ज्याप्रमाणे महिला मतदारांनी जातीय बंधने तोडून स्वतंत्रपणे मतदान केले, तसाच प्रकार आता तरुणांच्या बाबतीत घडताना दिसेल. तरुणांना मोफतच्या रेवड्या किंवा अवास्तव योजना नको आहेत; त्यांना भविष्याला आकार देणारे ठोस आणि शाश्वत उपाय हवे आहेत. राजकीय पक्षांना आता केवळ हवेतील आश्वासने देऊन चालणार नाही, तर प्रत्यक्षात आणता येतील अशी व्यावहारिक आश्वासनेच द्यावी लागतील.

# पोलिस दलात खांदेपालट पण; काहींची 'मॅट'ची तयारी?

प्रतिनिधी | ९ ऑगस्ट

अकोला: अकोला पोलिस दलात विशिष्ट लॉबी सक्रिय झाली असून पोलिस दलात, ठाणेदारांचे खांदेपालट होण्याची शक्यता वाढली आहे. असे असताना ज्यांचा कार्यकाळ पुर्ण झाला नाही अशांनी मॅट ची तयारी सुरु केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. अकोला सोडून गेलेल्या अधिकाऱ्यांना अकोला पाहिजे असून त्यांनी त्यासाठी तगडी फिल्डिंग लावली आहे. इतकेच काय तर काही आरोपींची अटक टाळण्यात या अधिकाऱ्यांचा हात असल्याची माहिती समोर आली आहे. सराईत गुन्हेगार आणि आरोपी अटक होऊ नये, यासाठीची फिल्डिंग लावणारे अधिकारी कोण याचा शोध वरिष्ठांनी घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अनेक प्रकरणात स्वतःच्या पोळ्या शेकणारे ठाणेदार आता वरिष्ठांच्या टप्प्यात आले आहे. त्यामुळे त्यांचे ठाणेदार हे पद जाऊ शकते व ते हेडक्वॉर्टर अटॅच होऊ शकतात या भितीपोटी काहींनी राजकीय नेत्यांकडे चकरा मारणे सुरु केले आहे. त्यात दोन नवे अधिकारी अकोल्यात दाखल होणार असून त्यांना क्रिम पोस्टिंग हवी आहे. त्यांची चहा च्या दूकानावर स्वतंत्र फिल्डिंग लावणे सुरु आहे. अकोल्यातील राजकीय नेते काय राजकारण करतील इतके राजकारण अकोला पोलिस दलात शिजत असून शहरातील क्राईम कंट्रोल पेक्षा आपण कसे वरचढ हे दाखविण्यात अधिकारी अग्रेसर आहे. ज्यांच्या बदल्या झाल्या आहे त्या पैकी काही पोलिस कर्मचाऱ्यांनी अद्याप नव्या ठिकाणी रुजू होण्याचे टाळले असल्याची माहिती आहे. इतकेच नाही तर काही आपल्या जुन्याच बॉस मंडळीसोबत एकनिष्ठ असून त्यांना विभागाची प्रत्येक माहिती पोहचविली जात आहे. कावड, गणेशोत्सवापुर्वी विभागात खांदेपालट झाल्यास आश्चर्य वाटू नये अशी काय ती परिस्थिती पोलिस दलात चर्चिली जात आहे.

# पुरावे असून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ

## टिचिंग - नॉन टिचिंगचा वाद, विद्यापीठ भ्रष्टाचार प्रकरण



प्रतिनिधी | ९ ऑगस्ट

**अकोला :** कृषी विद्यापीठातील लाखो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात टिचिंग आणि नॉन टिचिंग स्टॉफ यांच्यातील वाद आता चव्हाट्यावर आला आहे. संशोधन संचालक डॉ.श्यामसुंदर माने यांनी हा घोळ केला असून बिल काढलेल्या काही कामाचे पुन्हा देयके अदा करणे आमि त्याच्या १३०-१४० फाईल्स गहाळ करण्यात त्यांच्यासोबत इतर ही सहभागी आहे. डॉ.श्यामसुंदर माने यांच्यावर हे प्रकरण शेकल्यास त्यांचे संशोधन संचालक हे पद तर जाईलच त्याच बरोबर ते कुलगुरु पदाच्या रेस मधून बाहेर होतील. म्हणून अकोला पोलिसात तक्रार दाखल करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल होत नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. त्यात प्रकल्पग्रस्त निवड समितीचे अध्यक्षपद माने यांच्याकडे आहे.
कोरोना काळात काढलेले बिल पुन्हा काढण्यात तत्कालिन सहाय्यक कुलसचिव तथा आरहण व वितरण अधिकारी एच.एफ.राठोड आणि त्यांच्या सहकार्यांनी केलेल्या उद्योगामुळे विद्यापीठाच्या कारभारावर प्रश्न चिन्हं उपस्थित झाले आहे. त्यामुळे आता पोलिसांनी नॉन टिचिंग स्टाफ ला चौकशीसाठी पोलिस स्टेशनला बोलविल्याची माहिती समोर आली आहे. ज्यांनी बिल मंजुर केले, ज्यांनी कामे प्रस्तावित केले, ज्यांनी वर्क ऑर्डर दिली,डुप्लीकेट बिलांवर (कलर झेरॉक्स) सही केली ते मोकळे आणि नॉन टिचिंग स्टाफला नाहक वेठीस धरले जात असल्याची माहिती समोर आली आहे. राठोड यांची या सर्व प्रकरणात नुसती चौकशी नाही तर त्यांच्या अपसंपदेची चौकशी करण्याची गरज आता विद्यापीठातून व्यक्त केली जात आहे. राठोड यांनी या सर्व प्रकरणात कंत्राटादाराच्या नावाचे चेक न काढता थेट सहाय्यक कुलसचिव तथा आरहण व वितरण अधिकारी यांच्या नावाचे लाखो रुपयांचे चेक काढून पैसे स्वतःकडे वळते केल्याची माहिती आहे. त्यामुळे विद्यापीठ नियमानुसार दोषी अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्याची गरज होती. पण, विद्यापीठ प्रशासन तसे का करत नाही हा संशोधनाचा विषय आहे.

# मतदारसंघ पुनर्रचनेला 21 खासदारांचा विरोध!

## डीएमके, अण्णा डीएमके खासदारांनी फिरवली पाठ

वृत्तसंस्था | ९ ऑगस्ट

**चेन्नई :** केंद्र सरकारच्या प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय राज्यातील खासदारांची बैठक बोलावली. या बैठकीत उपाययोजनेवर चर्चा झाली, परंतु डीएमके आणि एआयएडीएमके पक्ष उपस्थित नव्हते. या बैठकीला काँग्रेस, व्हीसीके, सीपीआय, सीपीआय (एम), एमडीएमके आणि आययूएमएलचे २१ खासदार उपस्थित होते. एएनआयच्या वृत्तानुसार, भविष्यातील कोणत्याही मतदारसंघ पुनर्रचनेच्या व्यवस्थेअंतर्गत तामिळनाडूचे संसदीय प्रतिनिधित्व



कमी केले जाऊ नये, यावर सर्वांचे एकमत झाले. दरम्यान, शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीर बादल यांनी मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयकांना आपला पाठिंबा जाहीर केला.
बैठकीनंतर काँग्रेसचे खासदार कार्ती चिदंबरम म्हणाले की, हा मुद्दा पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन हाताळला पाहिजे. ते म्हणाले की, संसदेतील तामिळनाडूचे प्रतिनिधित्व संरक्षित केले पाहिजे. ते म्हणाले, तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमधील सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. आमच्यापैकी सुमारे २१ जण या बैठकीला उपस्थित होते. तामिळनाडूच्या हक्कांचे संरक्षण झालेच पाहिजे यावर पूर्ण एकमत झाले. संसदेतील आमचे प्रतिनिधित्व कमी केले जाऊ शकत नाही.

### महिला आरक्षण विधेयकावर काय घडलं?

महिला आरक्षणाशी संबंधित ‘नारी शक्ती वंदन कायदा’ २०२३ मध्ये संसदेने मंजूर केला. लोकसभा आणि राज्य विधानसभांमधील एक-तृतीयांश (३३ टक्के) जागा महिलांसाठी राखीव ठेवणे हा त्याचा उद्देश आहे. संबंधित सुधारणा विधेयकावर चर्चा होण्यापूर्वीच १६ एप्रिल रोजी त्याची अंमलबजावणी करण्यात आली. कायदा लागू होऊनही, महिलांना संसद आणि राज्य विधानसभांमध्ये तत्काळ ३३ टक्के आरक्षण मिळणार नाही. २०२३ च्या कायद्यानुसार, त्याची अंमलबजावणी केवळ २०२७ च्या जनगणनेनंतर आणि त्यावर आधारित मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच केली जाईल.

## हंडा ते बाटली...




**बदललेलं साधन, पण तीच शिस्त !** अकोल्यातील रस्त्यावरून जाणारी ही महिला म्हणजे संयम, जिद्द आणि अप्रतिम एकाग्रतेचा सुरेख संगम. डोक्यावर पाण्याचा भार असूनही चेहऱ्यावरचा शांतभाव आणि न डगमगणारी पावलं हेच दाखवून देतात की, परिस्थिती कोणतीही असो—ज्याला स्वतःचा तोल सांभाळता येतो, त्याला वाट काढणं कठीण जात नाही.

## गुटखा माफिया पुन्हा सक्रिय!

**अकोला :** अकोला शहरात दोन बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरणात कारवाईनंतर एफ डी ए चे अधिकारी तालुक्यात फिरत आहे. शहरात, एम आय डी सी मध्ये असलेल्या गोदामांकडे त्यांचे दूर्लक्ष का असा प्रश्न विचारला जात आहे. शहरातील प्रत्येक पान टपरीवर सकाळी बंदी असलेला गुटखा डिलिव्हर करणारे दूचाकी चालक धावपळ करताना दिसत असून ते ज्या गोदामातून हा माल पोहचवित आहे त्या ठिकाणी धाड टाकण्याचे धाडस एफ डी ए दाखविणार का असा प्रश्न विचारला जात आहे. एफ डी ए अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने हा गुटखा व्यवसाय तेजीत असल्याची माहिती आहे. अकोल्यातील प्रत्येक पान टपरीवर प्रतिबंधित गुटखा मिळत आहे. असे असताना तो थांबविण्यात विभाग पुर्णतः अपयशी झाल्याचे चित्र आहे.

# नोटबंदी, जीएसटीने उत्पादन व्यवस्था उद्ध्वस्त!

## खा. राहुल गांधींचा हल्लाबोल : ‘छात्रों की गूंज'मध्ये मांडले देशाचे वास्तव

वृत्तसंस्था | ९ ऑगस्ट



**प्रयागराज :** तुम्हाला 'मेड इन चायना' दिसेल, तुम्हाला 'मेड इन व्हिएतनाम' दिसेल, तुम्हाला 'मेड इन बांग्लादेश' दिसेल, पण तुम्हाला 'मेड इन इंडिया' दिसणार नाही. याचे कारण म्हणजे नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीने आपली उत्पादन व्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. जे छोटे व्यवसाय रोजगार देत असत, चामड्याचे उद्योग, वस्त्रोद्योग, वाहन उद्योग, विविध उद्योगांमधील उत्पादन हे सर्व संपले असल्याचा हल्लाबोल लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. प्रयागराजमध्ये छात्रों की गुंज कार्यक्रमाला बिहार आणि उत्तर प्रदेशातील विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.
राहुल गांधी म्हणाले की, दुसरं दार आहे उद्योजकतेचं,ज्याला 'स्टार्टअप इंडिया' म्हटले जात होते. भारतीय बँका तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांना एक रुपयासुद्धा कधीच देणार नाहीत. ९० टक्के लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगांना बँकेकडून कर्ज मिळत नाही. तिसरा दरवाजा, ज्याला आपण सरकारी नोकऱ्या म्हणतो, जिथे तुम्हाला पेपरफुटीचा सामना करावा लागतो. त्या दरवाज्यातून १५० तरुणांपैकी फक्त १ जणच पुढे जाऊ शकतो. जर १५० तरुणांनी परीक्षा देऊन सरकारी नोकरी मागितली, तर त्यापैकी फक्त १ जण निवडला जातो. सार्वजनिक क्षेत्र, जे १० वर्षांपूर्वी १४ लाख तरुणांना रोजगार देत असे त्या सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण झाले आहे.
सार्वजनिक शाळा बंद झाल्या आहेत, सार्वजनिक रुग्णालये बंद झाली आहेत, कंपन्या विकल्या गेल्या आहेत, बीएसएनएल विकली गेली आहे, आणि अशाच प्रकारच्या इतर कंपन्याही विकल्या गेल्या आहेत. म्हणूनच सार्वजनिक क्षेत्र बंद झाले आहे. तुमची शेवटची आशा होती, कॉर्पोरेट नोकऱ्या, आयटी, बॅक ऑफिस, ट्रान्सक्रिप्शन, सॉफ्टवेअर, जे पूर्वी भारतातील तरुणांना रोजगार देत होते तो दरवाजा तुमचा डेटा वापरून, एआय वापरून बंद केला जात आहे. तुमच्यासाठी पाचही दरवाजे बंद झाले आहेत, आणि म्हणूनच तुम्ही प्रचंड वेदना सहन करत आहात.

### प्रत्येक संस्थेत नोकरशाहीत प्रचारक!

अलाहाबाद विद्यापीठात आरएसएसचे कुलगुरू बसवून करण्यात आले आहे. प्रत्येक संस्थेत नोकरशाहीत प्रचारक, सैन्यात प्रचारक, प्रसारमाध्यमांमध्ये प्रचारक, न्यायपालिकेत प्रचारक, निमलष्करी दलात प्रचारक, विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रचारक! हीच ती व्यवस्था आहे जी मोहन भागवत, नरेंद्र मोदी, अमित शाह आणि अदानी चालवत असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला. या व्यवस्थेने नोकऱ्या नष्ट केल्या आहेत, या व्यवस्थेने विद्यापीठे ताब्यात घेतली आहेत, या व्यवस्थेने तुमच्यावर हल्ला केला आहे, असे राहुल गांधी तरूणांना संबोधित करताना बोलत होते.

# नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्गासाठी चक्काजाम!

## आंदोलक अन् पोलिसांमध्ये झटापट; सत्यजीत तांबे ताब्यात

प्रतिनिधी | ९ ऑगस्ट

**नाशिक :** नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा, या मागणीसाठी ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ठिकठिकाणी तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथील समृद्धी महामार्गाजवळ आ. सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार झटापट झाली. पोलिसांनी आक्रमक आंदोलकांना रोखण्यासाठी बळाचा वापर करत सत्यजीत तांबे यांना ताब्यात घेतले, यानंतर आंदोलकांनी समृद्धी महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा प्रयत्न केला.
पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प सुमारे १६ हजार कोटी रुपयांचा आहे. मात्र, जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील जागतिक दर्जाच्या 'जीएमआरटी' दुर्बिणीला धोका निर्माण होत असल्याचे कारण देत रेल्वे मंत्रालयाने मूळ मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला. पुणे–चाकण–मंचर–नारायणगाव–आळेफाटा–संगमनेर–सिन्नर–नाशिक असा मूळ मार्ग रद्द करून रेल्वे मंत्रालयाने नाशिक-शिर्डी-पुणतांबा आणि अहिल्यानगर-चाकण अशा पर्यायी मार्गाचे सर्वेक्षण केले आहे. या निर्णयामुळे खेड, आंबेगाव, जुन्नर, संगमनेर आणि सिन्नर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

### मूळ मार्ग मंजूर होईपर्यंत लढा सुरूच राहणार!

आंदोलनादरम्यान मंत्री गिरीश महाजन यांनी आ. सत्यजीत तांबे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सत्यजीत तांबे यांच्यातही चर्चा झाली होती. प्रकल्पाच्या तांत्रिक अभ्यासासाठी अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून त्यात रेल्वे बोर्ड व विभागीय आयुक्तांचा समावेश आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी आश्वासन दिले की, 'या समितीचा आणि जनसुनावणीचा निर्णय पुढील सात दिव सांत घेतला जाईल. या समितीला कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.' मात्र, आंदोलकांनी मूळ मार्ग मंजूर होईपर्यंत लढा सुरूच ठेवण्याचा इशारा दिला आहे.

## पाणी जपून वापरणे हिताचे

'पाणी हेच जीवन' आहे, कारण पाण्याशिवाय सजीवांच्या अस्तित्वाची कल्पना करणेही अशक्य आहे. मानवी शरीरापासून ते झाडे-वेली आणि प्राणी-पक्षांपर्यंत प्रत्येकाला जगण्यासाठी पाण्याची अत्यंत गरज असते. पृथ्वीवर जरी ७१% पाणी असले, तरी त्यातील पिण्यायोग्य आणि वापरण्यायोग्य गोडे पाणी हे १ टक्क्यापेक्षाही कमी आहे.

त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल आहे आणि तो जपून वापरणे काळाची गरज बनली आहे. आज जगभरात पाण्याची टंचाई दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. वाढती लोकसंख्या, प्रदूषण, जंगलांची कटाई आणि अनियमित पाऊस यांमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने खाली जात आहे.

# 9 ऑगस्ट : स्मरण ऑगस्ट क्रांतिदिनाचे



दुसऱ्या महायुद्धात पाठिंबा घेऊनसुद्धा ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले नाही, तेव्हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'छोडो भारत' आंदोलनाची हाक दिली. हा स्वातंर्त्यासाठीचा अंतिम लढा होता. 'चले जाव' आणि 'करेंगे या मरेंगे' हे दोन स्फूर्तिदायक मंत्र या लढ्याने दिले. या आंदोलनाची सुरुवात ९ ऑगस्ट १९४२ रोजी झाली होती. त्यामुळेच हा दिवस 'ऑगस्ट क्रांतिदिन' म्हणून पाळला जातो. मुंबईच्या ज्या गवालिया टँक मैदानातून या आंदोलनास सुरुवात झाली, ते आता 'ऑगस्ट क्रांती मैदान' नावाने ओळखले जाते. या आंदोलनाची आखणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ४ जुलै १९४२ रोजी तयार केलेल्या प्रस्तावाने झाली. 'आता जर ब्रिटिशांनी भारत सोडला नाही, तर व्यापक जनआंदोलन उभारले जाईल,' असा निर्वाणीचा इशारा या ठरावात देण्यात आला होता. येथून पुढे प्रत्येक नागरिकाला नेता बनावे लागेल, असे गांधीजींनी म्हटले होते. त्यामुळे पक्षभेद बाजूला ठेवून सर्वांनी काँग्रेसच्या झेंड्याखाली येऊन निकराचा लढा द्यावा, असे आवाहन करण्यात आले होते. तथापि, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, मुस्लीम लीग आणि हिंदू महासभेने या प्रस्तावाला विरोध केला. एवढेच नव्हे, तर काँग्रेसमध्येही या प्रस्तावावरून मतभेद झाले. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी पक्ष सोडला. पंडित जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासारखे नेतेही आंदोलनाबाबत सुरुवातीला साशंक होते. मात्र, त्यांनी गांधीजींना साथ देण्याचा निर्णय घेतला. सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, अशोक मेहता, जयप्रकाश नारायण यांनी या आंदोलनाला भक्कम पाठिंबा दिला. ८ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मुंबई अधिवेशनात 'छोडो भारत' प्रस्ताव संमत करण्यात आला.

'छोडो भारत' प्रस्तावाची कुणकुण ब्रिटिश सरकारला लागली होती. सरकारने गांधीजींना ताब्यात घेऊन पुण्याजवळील आगाखान पॅलेसमध्ये ठेवले. कार्यकर्त्यांची धरपकड केली आणि अनेक वरिष्ठ कार्यकर्त्यांना नगरच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. नेते कैदेत असल्यामुळे आंदोलन होणार नाही, हा ब्रिटिशांचा अंदाज चुकला. तरुण नेत्या अरुणा असफअली यांनी गवालिया टँक मैदानावर ठरल्याप्रमाणे ९ ऑगस्टला तिरंगा फडकावला आणि 'छोडो भारत' आंदोलनाचा बिगुल वाजला. जागोजागी आंदोलने झाली. गांधीजींनी संपूर्ण आंदोलन अहिंसेच्या मार्गाने करण्याचे आवाहन केले होते; मात्र ब्रिटिशांना आता हुसकावून लावायचेच, या ध्येयाने झपाटलेल्या काहीजणांकडून हिंसक घटनाही घडल्या. काही ठिकाणी विजेच्या तारा तोडण्यात आल्या, तर काही ठिकाणी बॉम्बस्फोटही झाले. टेलिफोन सेवा विस्कळीत करण्यात आली. काही जणांनी सरकारी इमारतींना आगीही लावल्या. अनेक ठिकाणी जिल्हा प्रशासनाला हटविण्यात आले. अटक केलेल्या काही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तुरुंग फोडून मुक्तता करवून घेतली आणि जागोजागी प्रशासनाला उखडून स्वतंत्र प्रशासनाची घोषणा केली. दुसऱ्या महायुद्धामुळे जर्जर झालेल्या ब्रिटिशांची या आंदोलनामुळे तारांबळ उडाली. काही इतिहासकारांनी केलेल्या वर्णनानुसार, या आंदोलनामुळेब्रिटिश सरकार पुरते हादरले. देशभरात ठिकठिकाणी गोळीबार झाला. शेकडो कार्यकर्त्यांना हौतात्म्य आले. लाखो कार्यकर्त्यांना अ ट ककरण्यात आली. परंतु तरीही आंदोलन विझले नाही. प्रत्येकाने नेता बनावे, हे गांधीजींचे आवाहन तंतोतंत पाळण्यात येत होते. अटक केलेल्या नेत्यांचा बाह्यजगाशी सुमारे तीन वर्षे संपर्कच नव्हता, तरीही आंदोलन थांबले नाही, हे १९४२ च्या आंदोलनाचे प्रमुख वैशिष्ट्ये होय.

अटकेत असलेल्या महात्मा गांधींनी आंदोलनकाळात प्रकृतीची पर्वा न करता २१ दिवस उपोषण केले. १९४४ मध्ये त्यांची प्रकृती खूपच नाजूक झाल्यामुळे त्यांची ब्रिटिशांनी सुटका केली. तोपर्यंत ब्रिटिशांनी परिस्थितीवर बऱ्यापैकी नियंत्रण मिळविले होते. परंतु गांधीजी आणि काँग्रेसला या आंदोलनामुळे देशातीलच काही नेत्यांच्या टीकेला सामोरे जावे लागले.

मोहंमद अली जिना हे काँग्रेसवर टीका करणाऱ्यांत आघाडीवर होते. डावे पक्ष आणि मुस्लीम लीगनेही काँग्रेसला टीकेचे लक्ष्य केले. परंतु तीनच वर्षात देश स्वतंत्र झाला, त्याला या आंदोलनाचा दणकाच कारणीभूत ठरला. १९४२ च्या आंदोलनाने 'आरपार लढाई'ची बीजे पेरली. ब्रिटिशांना हुसकावून लावल्याखेरीज स्वस्थ बसायचे नाही, या ध्येयाची ज्योत मनामनात चेतवली. भारताला स्वातंर्त्य देण्यावाचून गत्यंतर उरलेले नाही, हे ब्रिटिशांना कळून चुकले, ते याच आंदोलनामुळे. देशवासीयांनी ब्रिटिशांविरुद्ध जणू युद्धच पुकारल्याचे वातावरण निर्माण झाले होते. आंदोलनावर टीका करणारे मुख्यत्वे त्यावेळच्या अस्थिर परिस्थितीमुळे हताश झाले होते. सरकार कोणत्याही व्यक्तीला विनाचौकशी अटक करीत होते. ठिकठिकाणी दडपशाही सुरू होती आणि काँग्रेसचे टीकाकार या परिस्थितीमुळेच काँग्रेसला आणि गांधीजींना दोष देत होते.

सरकारनेही चिघळलेल्या परिस्थितीला गांधीजींनाच जबाबदार ठरविले. परंतु महायुद्धाच्या गदारोळात आंतरराष्ट्रीय परिस्थितीत होत असलेल्या बदलांमुळे ब्रिटिश सरकार बरेच कमजोर झाले होते. अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय होत होता. युद्धाची सूत्रेही अमेरिकेच्या हातात गेली होती. या बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेऊन, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास करून योग्य वेळी केलेले आंदोलन म्हणूनही 'छोडो भारत' आंदोलनाला वेगळे महत्त्व आहे. हेच या आंदोलनाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. काँग्रेसच्या जुलैमधील बैठकीत जो प्रस्ताव तयार करण्यात आला, त्यात आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर टिप्पणी करण्यात आली होती.

आठ ऑगस्टच्या काँग्रेस समितीच्या अधिवेशनात हा प्रस्ताव संमत करतानाही परिस्थितीचा ऊहापोह करण्यात आल्याचे दिसून येते. 'ब्रिटिशांनी भारताला स्वतंत्र करणे देशाच्या आणि जगाच्या दृष्टीने आवश्यक आहे,' असे समितीने म्हटले होते. साम्राज्यवाद, नाझीवाद, फॅसिझमविरुद्ध जे संघर्ष जगभरात सुरू आहेत, त्यातील शक्तींचे भवितव्य भारताच्या स्वातंर्त्यावर अवलंबून आहे. स्वातंर्त्याचा संबंध केवळ युद्धाच्या भवितव्याशी जोडलेला नसून, जगातील दडपल्या गेलेल्या तमाम मानवसमूहांशी आहे, असे भाष्य समितीने केल्याचे आढळते. 'भारत परतंत्र राहिल्यास युद्धोत्तर काळात तो साम्राज्यवादाचे प्रतीक बनेल, भविष्यातील आश्वासने आता जनतेला भुलवू शकणार नाहीत. स्वातंर्त्य ही एकच गोष्ट भारतीय जनतेत उत्साह निर्माण करू शकेल. म्हणूनच ब्रिटिशांनी भारतातून निघून जावे यासाठी सर्व ताकदीनिशी काँग्रेस समिती पुन्हा एकदा तीव्र आंदोलन सुरू करीत आहे,' असे भाष्य करणाऱ्या समितीने ब्रिटिश गेल्यानंतर काय होईल, हेही नमूद केले होते. स्वातंर्त्याची आंदोलने जगभरात ठिकठिकाणी त्यावेळी सुरू होती. त्या सर्वाच्या संकटात आणि संघर्षात संयुक्त राष्ट्रसंघाचा हिस्सा बनून भारत साथ देईल, अशी दूरदृष्टीची भूमिका काँग्रेस समितीच्या प्रस्तावात आढळते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे हंगामी सरकार कसे असेल, याचाही विचार समितीने केलेला होता. हे सरकार सर्व पक्ष आणि संघटनांच्या सहकार्याने बनेल आणि सर्व भागांतील जनतेचे प्रतिनिधित्व ते करेल. भारतावरील आक्रमणांचा अहिंसात्मक आणि लष्करी मार्गाने मुकाबला करून भारताचे संरक्षण करणे हे या सरकारचे प्राथमिक कार्य असेल. हे कार्य मित्रराष्ट्रांच्या सहकार्याने केले जाईल. शेती आणि कारखान्यांमध्ये कष्ट करणाऱ्यांच्या प्रगतीसाठी हे सरकार वचनबद्ध असेल. याच जनतेची भारतात खऱ्या अर्थाने सत्ता आहे. हंगामी सरकार घटना समितीची योजना तयार करेल व सर्व समाजघटकांना मान्य होईल अशी घटना तयार केली जाईल. घटनेत राज्यांना शक्य तेवढे स्वायत्त अधिकार दिले जातील, अशा अनेक भविष्यकालीन बाबींची योजना याच प्रस्तावात अंतर्भूत होती. तसेच परराष्ट्र धोरण काय राहील, हेही नमूद करण्यात आले होते.

. बर्मा, मलाया, इंडोचायना, डच, इराण आणि इराक या राष्ट्रांनाही स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, अशी भारताची भूमिका राहील हेही नमूद करण्यात आले होते. म्हणजेच, संपूर्ण स्वातंर्त्यासाठी हा अंतिम लढा आहे, एवढे फक्त ठरवून स्वातंर्त्यलढ्यातील नेते थांबले नाहीत तर त्यांनी भविष्याच्या योजनाही आखल्या होत्या. याखेरीज स्वातंर्त्य मिळविणे हे या आंदोलनाचे ध्येय असले तरी केवळ भारतापुरता विचार न करता अनेक परतंत्र राष्ट्रांना पाठिंबा देण्याची भूमिका घेण्यात आली होती. त्यामुळेच 'छोडो भारत' आंदोलन आणि ९ ऑगस्ट या क्रांतिदिनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## मूळनिवासी लोकांच्या हक्कांबद्दल जागरुकता निर्माण करणे!

### आज जागतिक आदिवासी दिन



जगातील मूळनिवासी लोकांच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी, दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी 'जागतिक मूळनिवासी दिन' साजरा केला जातो. हा दिवस पर्यावरण संरक्षणासारख्या जागतिक समस्या सुधारण्यासाठी मूळनिवासी लोकांनी केलेल्या कामगिरी आणि योगदानाला देखील मान्यता देतो. १९८२ मध्ये मानवाधिकार संवर्धन आणि संरक्षण उप-आयोगाच्या मूळनिवासी लोकांवरील संयुक्त राष्ट्र कार्यगटाच्या पहिल्या बैठकीच्या स्मरणार्थ, डिसेंबर १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने याची प्रथम घोषणा केली.

डिसेंबर १९९२ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने १९९३ हे वर्ष 'जागतिक आदिवासी लोकांचे आंतरराष्ट्रीय वर्ष' म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. जागतिक मूळनिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस सर्वप्रथम डिसेंबर १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र आमसभेने घोषित केला होता, जो जागतिक मूळनिवासी लोकांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय दशकादरम्यान (१९९५-२००४) दरवर्षी साजरा केला जाणार होता. २००४ मध्ये, आमसभेने 'कृती आणि प्रतिष्ठेचे दशक' या संकल्पनेसह २००५-२०१५ या कालावधीसाठी दुसरे आंतरराष्ट्रीय दशक घोषित केले. मूळनिवासी लोकांबद्दल संयुक्त राष्ट्रांचा संदेश पसरवण्यासाठी विविध राष्ट्रांतील लोकांना हा दिवस साजरा करण्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. मूळनिवासी लोकांबद्दल कौतुक आणि अधिक चांगली समज मिळवण्यासाठी उपक्रमांमध्ये शैक्षणिक मंच आणि वर्गातील उपक्रमांचा समावेश असू शकतो. २३ डिसेंबर १९९४ रोजीच्या ठराव ४९/२१४ नुसार, संयुक्त राष्ट्र महासभेने निर्णय घेतला की जागतिक आदिवासी लोकांच्या आंतरराष्ट्रीय दशकादरम्यान दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा केला जाईल. ही तारीख १९८२ मध्ये, मानवाधिकार प्रोत्साहन आणि संरक्षण उप-आयोगाच्या आदिवासी लोकसंख्येवरील संयुक्त राष्ट्र कार्यगटाच्या पहिल्या बैठकीचा दिवस आहे.

२०१६ साली, सुमारे २,६८० स्थानिक भाषा धोक्यात असून नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे नोंदवले गेले. त्यामुळे, संयुक्त राष्ट्रांनी लोकांना स्थानिक भाषांबद्दल पटवून देण्यासाठी, त्यांचे मन वळवण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी २०१९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्थानिक भाषा वर्ष' म्हणून घोषित केले. बांगलादेशातील चकमा मुलगा, रेबांग देवान याची कलाकृती, संयुक्त राष्ट्रांच्या स्थायी आदिवासी मंचाची दृश्य ओळख म्हणून निवडली गेली. जागतिक आदिवासी दिनाच्या प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्यावरही ती दिसली आहे. यामध्ये एकमेकांसमोर असलेली हिरव्या पानांची दोन कणसे आणि पृथ्वीसारखा दिसणारा एक गोल आहे. गोलाच्या आत मध्यभागी हस्तांदोलनाचे (दोन वेगवेगळे हात) चित्र आहे आणि हस्तांदोलनाच्या वर एक निसर्गरम्य पार्श्वभूमी आहे. गोलाच्या वरच्या आणि खालच्या बाजूस हस्तांदोलन आणि निसर्गरम्य पार्श्वभूमी निळ्या रंगाने वेढलेली आहे.

### कॅनडामधील उत्सव

किंग्स्टन, ओंटारियो येथे ओलिनद्वारे, जागतिक मूळनिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस हा कलाकार, वक्ते, कवी, सादरकर्ते आणि विविध प्रकारचे विक्रेते आणि सामुदायिक सेवा बूथसह सर्व-राष्ट्रांचा सामुदायिक उत्सव म्हणून साजरा केला जातो.

### तैवानमधील उत्सव

२०१६ मध्ये, राष्ट्राध्यक्ष त्साई इंग-वेन यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने तैवानमध्ये १ ऑगस्ट हा 'आदिवासी लोकांचा दिवस' म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली . या विशेष दिवसाच्या निमित्ताने, राष्ट्राध्यक्ष त्साई यांनी देशातील आदिवासी लोकांची अधिकृत माफी मागितली आणि कायद्याला अधिक चालना देण्यासाठी तसेच राष्ट्रपती कार्यालयाच्या 'आदिवासी ऐतिहासिक न्याय आणि संक्रमणकालीन न्याय समिती' सारख्या आदिवासींच्या प्रश्नांशी संबंधित संस्थांना सामील करून घेण्यासाठी उपाययोजनांची रूपरेषा आखली. सरकारला आशा आहे की हा दिवस आदिवासी लोकांच्या संस्कृती आणि इतिहासाप्रती अधिक आदर निर्माण करून आणि त्यांच्या हक्कांना प्रोत्साहन देऊन तैवानमधील विविध वांशिक गटांची लोकांना आठवण करून देईल.

## स्वर्ग, नरक आणि आपण

*मृत्यूनंतर स्वर्गात जागा मिळावी म्हणून माणूस आयुष्यभर किती धडपड करतो. कुणी उपवास करतो, कुणी दानधर्म करतो, कुणी तीर्थयात्रा करतो, कुणी देवाला नवस बोलतो. जणू काही स्वर्ग म्हणजे एखादी नवीन हौसिंग सोसायटी आहे आणि तिथे 1 BHK बुक करण्यासाठी पॉइंट्स जमा करायचे आहेत*

पण मला एक प्रश्न पडतो.

जर आपण आधीच स्वर्गात राहत असू तर?

जरा सकाळी उठल्यावर आजूबाजूला नीट बघा.

बटण दाबलं की दिवा लागतो. दुसरं बटण दाबलं की पंखा फिरतो. तिसरं दाबलं की एसी सुरू होतो. नळ उघडला की पाणी येतं. गॅस पेटवला की काही मिनिटांत जेवण तयार होतं. मोबाईल काढला की जगभरातील माहिती हातात येते. एखादा मित्र अमेरिकेत असला तरी सेकंदात त्याचा चेहरा दिसतो.

आणि हे सगळं आपण इतक्या सहज घेतो की जणू काही ही पृथ्वीवरची नाही तर जन्मसिद्ध सुविधा आहे. आजपासून फक्त दोनशे वर्षांपूर्वीच्या एखाद्या राजाला जर आपल्या घरात आणलं तर तो कदाचित घराबाहेर पडायलाच तयार होणार नाही.

"हे काय?" "गरम पाणी."

"हे?" "थंड हवा."

"हे?" "जगभरातील माहिती."

"हे?" "दहा मिनिटांत पिझ्झा घरी."

राजा म्हणेल, "मी आयुष्यभर राज्य केलं, युद्धं जिंकली, खजिने गोळा केले, पण हे सुख तर मला कधीच मिळालं नाही!" म्हणजे वस्तुस्थिती अशी आहे की आजचा सामान्य माणूस अनेक बाबतीत कालच्या राजापेक्षा सुखात जगतो.

पण गंमत बघा.

आपण या सगळ्या गोष्टींकडे बघत नाही.

कारण माणसाकडे जे असतं त्याची किंमत नसते.

एसी सुरू आहे म्हणून आनंद नाही.

एसी बंद पडला की दुःख.

मोबाईल आहे म्हणून आनंद नाही.

नेटवर्क गेलं की जग संपल्यासारखं.

घर आहे म्हणून आनंद नाही.

शेजाऱ्याचं घर मोठं आहे म्हणून दुःख. गाडी आहे म्हणून आनंद नाही. त्याच्याकडे मोठी गाडी आहे म्हणून दुःख. माणूस स्वतःच्या स्वर्गात उभा राहून दुसऱ्याच्या स्वर्गाची तुलना करत असतो. पण त्याच वेळी पृथ्वीवर दुसरं चित्रही आहे. आजही लाखो लोक प्यायच्या पाण्यासाठी रांगेत उभे असतात.

काही जणांकडे राहायला पक्कं घर नाही. काही जणांना दोन वेळच्या जेवणाची खात्री नाही. काही मुलांना शिक्षण मिळत नाही. काही लोकांकडे घालायला पुरेसे कपडेही नाहीत. आपण ज्या गोष्टींना "सामान्य" म्हणतो, त्या अनेक लोकांच्या आयुष्याचं स्वप्न असतात. आपल्याला नळातून येणारं पाणी दिसतं. त्यांना पाण्यासाठी किलोमीटर चालावं लागतं. आपल्याला एसीचा रिमोट सापडत नाही म्हणून राग येतो. त्यांना उन्हापासून बचावासाठी झाडाची सावली शोधावी लागते.

आपण डाएट प्लॅन शोधतो. ते पुढचं जेवण कुठून येईल याचा विचार करतात. म्हणूनच मला वाटतं स्वर्ग आणि नरक हे मृत्यूनंतरचे पत्ते नसावेत. ते इथेच आहेत. एकाच शहरात. एकाच गावात. कधी कधी एकाच रस्त्यावर. एका घरात मुलगा नवीन मोबाईल स्लो झाला म्हणून नाराज असतो. समोरच्या घरात मुलगा ऑनलाइन वर्गासाठी मोबाईल नसल्यामुळे शिकू शकत नाही. एका माणसाला गरम पाणी उशिरा आलं म्हणून त्रास होतो. दुसऱ्याला पाणीच मिळालं तर तो आनंदाने आंघोळ करतो. फरक फक्त परिस्थितीचा नाही. फरक दृष्टीकोनाचाही आहे. कारण काही लोक नरकात राहूनही हसतात. आणि काही लोक स्वर्गात राहूनही कुरकुर करतात.

माणसाची एक सवय खूप विचित्र आहे.

तो जे नाही त्याची यादी रोज बनवतो. पण जे आहे त्याची यादी कधीच बनवत नाही. जर प्रत्येकाने रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाच गोष्टी लिहिल्या...

आज मला श्वास घेता येतो.

आज माझ्याकडे पिण्याचं पाणी आहे.

आज माझ्याकडे खायला अन्न आहे.

आज माझ्याकडे झोपायला जागा आहे.

आज माझे प्रिय माणसं माझ्यासोबत आहेत.

...तर कदाचित आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलून जाईल.आपण स्वर्ग शोधत आहोत.

पण कदाचित स्वर्ग ही एखादी जागा नसून एक जाणीव आहे. आणि नरकही एखादी जागा नसून एक विस्मरण आहे. जे आहे त्याची किंमत विसरणं म्हणजे नरक. जे आहे त्याबद्दल कृतज्ञ असणं म्हणजे स्वर्ग. बाकी मृत्यूनंतर काय मिळेल हे कुणालाच माहीत नाही. पण जिवंत असताना पृथ्वीसारखा ग्रह, श्वास घेण्यासाठी हवा, प्यायला पाणी, खायला अन्न, प्रेम करणारी माणसं आणि बटण दाबल्यावर मिळणाऱ्या हजारो सुविधा मिळालेल्या असताना सतत दुःखी राहणं... हा देखील थोडासा विनोदच आहे.

**कदाचित देव वर बसून हसत असेल...**

"अरे, मी तुम्हाला स्वर्गात पाठवलं होतं. तुम्ही तिथेही तक्रार केंद्र सुरू केलंत!" हसा-हसवा,सुखी-समाधानी व आनंदी जीवनच महत्त्वाचे.

## गांधीजींनी दिली होती भारत छोडो आंदोलनाची ललकार

भारत छोडो आंदोलन (Quit India Movement) हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक टप्पा होता. ८ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी ब्रिटिश हुकूमशाहीला भारतातून समूळ उखडून फेकून देण्यासाठी या आंदोलनाचे आवाहन केले होते. याला 'ऑगस्ट क्रांती' म्हणूनही ओळखले जाते.



### १. आंदोलनाची मुख्य कारणे

क्रिप्स मिशनचे अपयश (१९४२): दुसऱ्या महायुद्धात भारतीयांचे सहकार्य मिळवण्यासाठी ब्रिटिश सरकारने सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक मिशन भारतात पाठवले. परंतु हे मिशन भारतीयांना पूर्ण स्वातंत्र्याचे कोणतेही ठोस आश्वासन देऊ शकले नाही, ज्यामुळे सर्वत्र निराशा पसरली. दुसऱ्या महायुद्धातील परिस्थिती: दुसऱ्या महायुद्धामुळे भारतात महागाई, वस्तूंची टंचाई आणि आर्थिक संकट गंभीर बनले होते. तसेच जपानी सैन्य आग्नेय आशियात वेगाने पुढे सरकत होते, ज्यामुळे भारतावरही आक्रमणाचा धोका घोंगावत होता.

**बर्मामधील भारतीयांशी दुर्व्यवहार:** बर्मा (म्यानमार) येथून भारतात परतणाऱ्या भारतीय निर्वासितांशी इंग्रजांकडून केला जाणारा भेदभावपूर्ण व्यवहार जनतेच्या क्रोधाला कारणीभूत ठरला.

### २. आंदोलनाची सुरुवात आणि 'करो किंवा मरो'

प्रस्ताव मंजूर: ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील (तत्कालीन बॉम्बे) गोवालिया टँक मैदानावर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत 'भारत छोडो' प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली.

**गांधीजींचा ऐतिहासिक मंत्र:** याच मैदानावरून महात्मा गांधींनी देशवासीयांना "करो किंवा मरो" (Do or Die) हा नारा दिला. ते म्हणाले की, "आपण एकतर भारताला आझाद करू किंवा या प्रयत्नात आपला प्राण त्यागू."

### ३. 'ऑपरेशन झिरो अवर' आणि जनआंदोलन

प्रमुख नेत्यांची अटक: ९ ऑगस्ट १९४२ च्या सकाळी ब्रिटिश सरकारने 'ऑपरेशन झिरो अवर' चालवून महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, अबुल कलाम आझाद यांच्यासह काँग्रेसच्या जवळजवळ सर्व मोठ्या नेत्यांना अटक करून वेगवेगळ्या तुरुंगात डांबले.

**नेतृत्वहीन तरीही उग्र आंदोलन:** प्रमुख नेत्यांच्या अटकेनंतरही हे आंदोलन थांबले नाही, तर ते एक उत्स्फूर्त (Self-spontaneous) जनआंदोलन बनले.

युवा आणि भूमिगत नेतृत्व: जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, अरुणा असफ अली आणि उषा मेहता यांसारख्या युवा नेत्यांनी भूमिगत होऊन आंदोलनाचे संचालन केले. अरुणा असफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला. उषा मेहता यांनी गुप्तपणे 'काँग्रेस रेडिओ' चालवले.

**समांतर सरकारांची स्थापना:** देशातील अनेक भागांत ब्रिटिश शासन पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आणि स्थानिक लोकांनी आपली स्वतःची सरकारे (Parallel Governments) स्थापन केली.

**बलिया (उत्तर प्रदेश):** चित्तू पांडे यांच्या नेतृत्वाखाली.

**तमलुक (बंगाल) :** 'जातीय सरकार'ची स्थापना.

**सातारा (महाराष्ट्र):** 'प्रति सरकार'ची स्थापना (जे सर्वात दीर्घकाळ टिकले).

### ४. ब्रिटिश सरकारची दमनकारी नीति

इंग्रजी सरकारने आंदोलन चिरडण्यासाठी अत्यंत क्रूर मार्ग अवलंबला: आंदोलकांवर लाठीचार्ज, अंधाधुंध गोळीबार आणि हवाई हल्लेसुद्धा करण्यात आले.

सुमारे १ लाखांहून अधिक लोकांना अटक करण्यात आली. अनेक गावांवर भारी दंड आकारण्यात आला आणि मालमत्ता जप्त करण्यात आल्या.

### ५. भारत छोडो आंदोलनाचे महत्त्व आणि प्रभाव

स्वातंत्र्याचा पाया: जरी इंग्रजांनी तात्पुरत्या स्वरूपात हे आंदोलन दाबून टाकले असले, तरी या आंदोलनाने हे स्पष्ट केले की आता भारतीय जनतेवर दीर्घकाळ राज्य करणे अशक्य आहे.

**जनसहभाग:** या आंदोलनात शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला.

**आंतरराष्ट्रीय दबाव:** या आंदोलनानंतर अमेरिका आणि चीनसारख्या देशांनीही ब्रिटनवर भारताला लवकरात लवकर स्वातंत्र्य देण्यासाठी दबाव आणला.

भारत छोडो आंदोलनाने ब्रिटिश साम्राज्याची पायामुळे हादरवून टाकली आणि या घटनेच्या ठीक ५ वर्षांनंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.





## मेळघाटचे सौंदर्य बहरले: निसर्गाच्या कुशीतील हिरवागार चमत्कार

पावसाळ्याच्या आगमना सोबतच अमरावती जिल्ह्यातील मेळघाटचे अभयारण्य एका नव्या रूपात नटून थटून तयार झाले आहे. उन्हाळ्यात रखरखणारा आणि पांढऱ्या-तपकिरी रंगात वेढलेला मेळघाट आता हिरवळीची शाल पांघरून उभा आहे. डोंगरदऱ्या, उफाळून येणारे धबधबे आणि दाट धुक्याची चादर यामुळे सध्या मेळघाटचे सौंदर्य अत्यंत लोभसवाणी आणि विलोभनीय दिसत आहे.

### धबधबे आणि नद्यांना आला नवीन साज

पावसाच्या धारा कोसळताच मेळघाटमधील लहान-मोठे धबधबे जिवंत झाले आहेत. चिखलदऱ्याचा प्रसिद्ध 'भीमकुंड' धबधबा असो वा 'मुक्तागिरी'च्या कुशीतील निसर्ग, सर्वत्र पाण्याचे उफाळणारे प्रवाह पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. तापी, सिपना आणि गाडगा या नद्याही आता पूर्ण क्षमतेने वाहू लागल्या असून, त्यांच्या पात्रातील खळाळणारा आवाज निसर्गाच्या संगीताची अनुभूती देतो.

### धुक्याची दुलई आणि आल्हाददायक हवामान

समुद्रसपाटीपासून उंचावर असलेल्या चिखलदरा आणि आसपासच्या परिसरात सध्या ढग आणि धुक्याचा लपंडाव सुरू आहे. डोंगराच्या कड्यांवरून वाहणारे धुके आणि गार वारा यामुळे या भागात उन्हाळ्याची दाहकता पूर्णपणे नाहीशी झाली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी संपूर्ण परिसर धुक्यात हरवून जातो, ज्यामुळे पर्यटकांना स्वर्गीय सुखाचा अनुभव मिळतो.

### वनस्पती आणि वन्यजीवांचे चैतन्य

मेळघाट हा प्रामुख्याने सागवानाच्या जंगलासाठी आणि 'व्याघ्र प्रकल्प' म्हणून ओळखला जातो. पावसाळ्यात येथील बांबूची वने, विविध औषधी वनस्पती आणि रानफुले फुलून येतात. या मोसमात जंगलातील वन्यजीव जसे की गवा (भारतीय बायसन), चितळ, सांबर आणि अनेक प्रजातींचे पक्षी या नव्याने बहरलेल्या निसर्गात मोकळेपणाने वावरताना दिसतात

### पर्यटकांची पावले मेळघाटकडे

मेळघाटचे हे बहरलेले सौंदर्य पाहण्यासाठी विदर्भासह राज्यभरातून निसर्गप्रेमी आणि पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. ट्रेकिंग, वाईल्डलाईफ फोटोग्राफी आणि रोजच्या धकाधकीच्या जीवनातून शांतता शोधणाऱ्यांसाठी सध्या सर्वोत्तम ठिकाण बनले आहे.



# भाजपच्या भव्य तिरंगा बाईक रॅलीने गर्जला देशप्रेमाचा नारा



प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष अकोला महानगरच्या वतीने रविवारी (९ ऑगस्ट) शहरात भव्य तिरंगा बाईक रॅलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. हातात राष्ट्रध्वज घेवून आणि भारत माता की जयच्या घोषणा देत हजारो कार्यकर्त्यांच्या सहभागाने अकोला शहर देशभक्तीमय वातावरणात दुमदुमून गेले.

सकाळी साडेनऊ वाजता जुन्या शहरातील ऐतिहासिक असदगड किल्ला चौक येथून रॅलीला प्रारंभ झाला. या रॅलीचे नेतृत्व महाराष्ट्र विधानसभा मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, भाजप महानगर अध्यक्ष जयंत मसने, मनपा सभापती विजय अग्रवाल आणि महापौर शारदा खेडकर यांच्या

## शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती

प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

असदगड किल्ला चौकातून निघालेली रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून जात नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती. असदगड किल्ला चौक (प्रारंभ)जय हिंद चौक,सिटी कोतवाली चौक,गांधी चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह,फतेह चौक,टॉवर चौक,श्री अग्रसेन महाराज चौक,दुर्गा चौक,सिव्हिल लाईन चौक,शहीद हुतात्मा स्मारक (समारोप) रॅलीचा भव्य समारोप सिव्हिल लाईन येथील शहीद हुतात्मा स्मारकावर झाला. जिथे उपस्थितांनी हुतात्म्यांना अभिवादन केले.

'जिल्ह्यातील प्रत्येक गावातून तिरंगा रॅली निघणार' — खासदार अनुप धोत्रेरॅलीदरम्यान पत्रकारांशी बोलताना खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले की, 'स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्तीची भावना प्रत्येक नागरिकाच्या





मनात जागृत ठेवण्यासाठी ही मोहीम केवळ शहरापुरती मर्यादित राहणार नाही.

अकोला जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात आणि गावागावांतून अशा तिरंगा रॅलींचे आयोजन करून राष्ट्रभक्तीचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला जाईल.'पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती या बाईक रॅलीमध्ये भाजपचे महानगर व मंडळ पदाधिकारी, विविध मोर्चा व सेलचे प्रतिनिधी, माजी व विद्यमान नगरसेवक, बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख, ज्येष्ठ नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने बाईकवर हेल्मेट परिधान करून सहभागी झाले होते. रॅलीनंतर सर्व उपस्थितांसाठी भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

# तेल्हारा येथे 4 लाख 84 हजारांचा प्रतिबंधित गुटखा जप्त; वाहनासह एक आरोपी ताब्यात

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

तेल्हारा : शहरात शनिवारी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत ₹४ लाख ८४ हजार रूपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला असून, गुटख्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले मॅकिझमो वाहन (MH-30-AZ-8613) देखील ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान एका आरोपीला ताब्यात घेण्यात



आल्याची माहिती समोर आली आहे. मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा पकडल्याने तेल्हारा परिसरात खळबळ उडाली आहे.

जप्त मुद्देमाल व आरोपीविरोधात अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती आहे.

# ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांच्या उपस्थितीत लाखपुरीत महाआरती



प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**मुर्तीजापुर:** श्री संत गजानन महाराज संस्थान, लाखपुरीच्या वतीने रामायणाचार्य ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली.

धार्मिक कार्यक्रमाला गावातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती. संजय महाराज पाचपोर यांनी भक्तांना भक्ती, सेवा आणि एकतेचा संदेश दिला. तसेच त्यांनी गावकऱ्यांना चांगल्या सूचना केल्या आणि आध्यात्मिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन रामायणाचार्य ह.भ.प. मनोहरपंत कुलकर्णी यांनी केले. ह.भ.प. पंढरी महाराज डिगोडे, ह.भ.प. गणेश महाराज पाटील, ह.भ.प. तराळ महाराज, डॉ. कौलखेडे, संजय पखाले, उमेश ठाकरे, नंदुभाऊ दिवनाले, अनिल गावंडे, यशवंत काबे, दिपक बावनेर, गिरीधर मानकर, श्रीकृष्ण वाकोडे, गजानन पाटील वैद्य, तनुश बावनेर, गजानन कोकाटे, प्रभाकर दाते उपस्थित होते. भजनी मंडळांचाही सहभाग होता.

# विद्यार्थ्यांनी घेतले सायबर सुरक्षा सोबतच व्यसनमुक्तीचे धडे

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** यंग मुस्लिम एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटी पातूर व्दारा संचलित सैयद मोहसीन उर्दू हायस्कूल शिवनी येथे मिशन उडान अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्ष मुख्याध्यापक सैयद मोहिब इकबाल होते. तर प्रमुख अतिथी एमआयडीसीचे ठाणेदार विजय जाधव होते.

जाधव यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्ती व सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन केले. गोपाल मुकुंदे मिशन उडान समन्वयक यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्त, तंबाखू मुक्त परिसर, सायबर




सुरक्षा, हेल्मेट, गुड टच बॅड टच बाबत विध्यार्थ्यांना शपथ दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दामीनी पथकचे चंदूजी राखोंडे, तनुश्री पांडे, वैभव सुरडकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन मोहम्मद अनवारोद्दीन यांनी तर आभरप्रदर्शन आसीमोद्दीन यांनी केले. शाळेतील सहायक शिक्षक शमशेर खान मोहम्मद जाहीद, अजमतुल्ला खान, मोहम्मद फारूख, अब्दुल शकुर सैयद वसीम यांनी परीश्रम घेतले.

# एसटी पासचा सावळागोंधळ!
## साधी बस आणि शिवशाही-शिवनेरीला वेगळा दर

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह नियमित प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांसाठी एसटी महामंडळाकडून मासिक पासची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. मात्र, साध्या बसच्या तुलनेत शिवशाही आणि शिवनेरी बसच्या पासच्या दरांबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयात ये-जा करण्यासाठी साध्या एसटी बसच्या दरानुसार सवलतीच्या पासची सुविधा दिली जाते. तसेच नोकरी, व्यवसाय किंवा अन्य नियमित कामासाठी एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठीही अंतरानुसार मासिक पास उपलब्ध करून दिला जातो.

मात्र, साध्या बसच्या मासिक पासचे दर आणि शिवशाही तसेच शिवनेरी बसच्या पासचे दर वेगवेगळे असल्याने नेमक्या कोणत्या बससाठी कोणत्या दराचा पास मिळतो, याबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम आहे. काही प्रवाशांना शिवशाही अथवा शिवनेरी बससाठी स्वतंत्र मासिक पासची सुविधा उपलब्ध आहे की नाही, याची स्पष्ट माहिती नसल्याचे चित्र आहे.

एसटी प्रशासनाकडून विविध प्रकारच्या बससेवांसाठी स्वतंत्र पासदर निश्चित केले असल्यास त्याची माहिती प्रवाशांना स्पष्टपणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पास काढताना साधी बस, शिवशाही किंवा शिवनेरी यापैकी कोणत्या सेवेसाठी पास वैध आहे, तसेच त्यासाठी किती शुल्क आकारले जाते, याची माहिती आगारातील पास केंद्रावर दर्शविण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# गावंडगावात वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याची विटंबना

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**पातूर :** तालुक्यातील गावंडगाव येथे बंजारा समाजाचे आराध्य तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या अर्धपुतळ्याची विटंबना झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे.

या घटनेमुळे बंजारा समाजात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान,

## 12 ऑगस्टला मोर्चा, सकल गोर बंजारा आरक्षण समितीचा इशारा

या प्रकरणी तिघांना ताब्यात घेतले आहे. या घटनेच्या निषेधार्थ गावंडगाव तांड्यातील सुमारे ५०० नागरिकांचा जमाव उशिरा रात्री चान्नी पोलीस ठाण्यावर आला.

प्रशासनाकडून तातडीने ठोस कारवाई न झाल्यास बुधवार, १२ ऑगस्ट रोजी सकल गोर बंजारा आरक्षण समितीच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे. या मोर्चाचे नेतृत्व पुतळा संरक्षण समिती, गावंडगाव-अकोलाचे रामेश्वर ज. राठोड करणार असून, समितीचे पदाधिकारी, युवा कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणात चान्नी पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले असल्याची माहिती ठाणेदार गंगाधर दराडे यांनी दिली आहे.



# नाताची आजीला शिवीगाळ, गुन्हा दाखल

**हिवरखेड :** बेलखेड येथे ८ ऑगस्टच्या सकाळी भंगार विकण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. आणि रागाच्या भरात नातने आजीला शिवीगाळ करून वडिलांवर हात उचल्याची तक्रार हिवरखेड पोलिसात वडिलांनी मुला विरुद्ध केल्याचे नमूद आहे. यावरून हिवरखेड पोलिसांनी आरोपी विरुद्ध बी ए एन एस नुसार कलम ११८,३५१,३५२ नुसार गुन्हा दाखल केला, ही नात्याला काळिमा फासणारी घटना असून याबाबत पुढील तपास पोलिस करीत आहेत

# पातूरमध्ये जागतिक आदिवासी दिन उत्साहात; मोटरसायकल रॅलीतून एकजुटीचा संदेश

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**पातूर :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त पातूर शहरात रविवारी, दि. ९ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले स्मारक समिती, बिरसा आर्मी तसेच बिरसा क्रांती दलाच्या वतीने शहरातून भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी पातूर शहरातील मुख्य छत्रपती संभाजी महाराज चौक येथील



महात्मा ज्योतिबा फुले स्मारक परिसरात क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचेही पूजन करून अभिवादन करण्यात आले.

बिरसा आर्मी तसेच बिरसा क्रांती दलाच्या पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोटरसायकल रॅलीत मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक संघर्ष, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला पातूर शहरातील माजी नगर परिषद उपाध्यक्ष परसरामजी उंबरकार, पंचायत समितीचे माजी सभापती अनंत उर्फ बाळू बगाडे, डॉ. प्रशांत लोथे, सुरेंद्र उगले, नवनिर्वाचित नगर परिषद उपाध्यक्ष अजय पाटील, अजय ढोणे, निरंजन बंड, डॉ. संतोषजी भिसे, पत्रकार प्रदीप काळपांडे, बाळूभाऊ उगले, बिरसा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष विलास धोंगडे, बिरसा आर्मीचे पांडे गुरुजी, पत्रकार किरण कुमार निमकंडे, बंडू लोखंडे, निलेश बगळेकर, निलेश बोचरे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मार्डी आश्रमशाळेतील चिमुकल्यांसोबत आ. हरीश पिंपळे यांनी घालवला आनंददायी क्षण



**मूर्तिजापूर :** अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील मार्डी येथील आश्रमशाळेला आमदार हरीश पिंपळे यांनी आपल्या चिरंजीव रोहन पिंपळे यांच्यासह सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत काही वेळ आनंदात व्यतीत केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य आणि उत्साह पाहून आमदार पिंपळे भावूक झाले. लहान मुलांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांनी त्यांना फळे व बिस्किटांचे वाटप केले.

# गाडगेबाबांच्या विचारांचा सेवावसा अखेरच्या श्वासापर्यंत जपणारे बापूसाहेब देशमुख यांचे निधन

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांनी समाजाला दिलेला सेवा, त्याग, स्वच्छता आणि मानवतेचा संदेश आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत जपणारे सेवाव्रती, श्री गाडगे महाराज मिशन, मुंबईचे उपाध्यक्ष तथा श्री गाडगे महाराज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त आणि संत गाडगेबाबांच्या संकल्पनेतील नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार स्व. बापूसाहेब देशमुख यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मूर्तिजापूरसह विदर्भातील गाडगेबाबांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

बापूसाहेब देशमुख यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे सेवा, त्याग, समर्पण आणि मानवतेचा अखंड ध्यास होते. संत गाडगेबाबांनी समाजाच्या उद्धारासाठी दाखवून दिलेला सेवामार्ग त्यांनी केवळ स्वीकारला नाही, तर तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनविला. समाजातील गरजू, वंचित,



दुःखी आणि निराधार व्यक्तींच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर राहिले. मूर्तिजापूरच्या सामाजिक जीवनात बापूसाहेब देशमुख यांचे स्थान अत्यंत आदराचे होते. गाडगेबाबांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या साधेपणातून, सेवाभावातून आणि कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

**नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार :** संत गाडगेबाबांच्या संकल्पनेतील नागरवाडी इंद्रभुवन उभारण्यात बापूसाहेब देशमुख यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

**आज सायंकाळी अंतिम यात्रा :** स्व. बापूसाहेब देशमुख यांची अंतिम यात्रा आज सायंकाळी ४ वाजता श्री गाडगे महाराज गोरक्षण संस्था येथून निघणार आहे. त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

**मायेचा आधारवड हरपला : आमदार हरीश पिंपळे :** गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा वसा आयुष्यभर जपत,मायेचा आधारवड हरपला अशी संवेदना आमदार हरीश पिंपळे यांनी व्यक्त केली. मामा, तुमची उणीव आयुष्यभर जाणवत राहील, अशा शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

**बापूसाहेब गाडगेबाबांचे सेवक :** सतीश अग्रवाल बापूसाहेब देशमुख हे संत गाडगेबाबांच्या विचारांचे खरे सेवक होते. त्यांच्या कार्याची आणि समाजाप्रती समर्पणाची आठवण कधीही विसरता येणार नाही, असे सतीश अग्रवाल म्हणाले.

# आयटीआय मध्ये आज व उद्या समुपदेशन फेरी




प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे अखेरची फेरी १२ ऑगस्ट पासून सुरू होणार आहे.

९ व १० ऑगस्ट रोजी इच्छुक तसेच ज्यांना प्रवेश अद्याप मिळाला नाही अशा उमेदवारांनी आपल्या ऑनलाईन लॉगिन मधून हजेरी दाखल करावी असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंके यांनी केले आहे. संस्थेत विविध व्यवसायातील केवळ २०२ जागा या फेरी मध्ये रिक्त आहेत.

त्या करिता दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संस्थेमध्ये आपली मूळ कागदपत्रे तसेच अर्जाची प्रत घेऊन प्रत्यक्ष उमेदवार याने संस्थेत उपस्थित राहावे. असे आवाहन संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी केले आहे.

## Change Name

I WANT TO CHANGE MY NAME IS MY OLD PASSPORT NUMBER J4351639. MY OLD NAME WAS **MOHAMMED YUSUF YASIN GHANIWALE** NOW MY NEW NAME IS **MOHD YUSUF MOHD YASIN GHANIWALA** **ADDRESS:-** KACCHI LINE, MAIN ROAD, OLD CITY, MURTIZAPUR. DISTRICT :- AKOLA. ( MAHARASHTRA ) PIN:- 444107.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# 28 वर्षांनंतर मालमत्तेचे खरेदीखत रद्द

## वडिलोपार्जित मालमत्ता प्रकरण; वारसाला अखेर ताबा

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**उमरखेड** : वडिलोपार्जित मालमत्तेची कायदेशीर वाटणी न करता वारसाचा हक्क डावलून करण्यात आलेले खरेदीखत रद्द करून संबंधित मालमत्तेची प्रत्यक्ष वाटणी करीत वारसाला ताबा देण्याचा आदेश न्यायालयाने दिला. तब्बल २८ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढाईनंतर मरसुळ येथील अतिश कदम यांना अखेर न्याय मिळाला.

मरसुळ येथील अतिश तातेराव कदम व इतरांची वडिलोपार्जित मालमत्ता होती. ही मालमत्ता तातेराव कदम यांना त्यांच्या भावांमध्ये झालेल्या वाटणीतून मिळाली होती. मात्र, तातेराव कदम यांनी मुलगा अतिश, तीन मुली आणि पत्नी यांच्यात कायदेशीर वाटणी न करता संबंधित मालमत्ता रंजना बिच्चेवार व शंकर गिरी यांना विकली. या व्यवहारात आपला हक्क डावलण्यात आल्याचा दावा करीत अतिश कदम व त्यांच्या आई-बहिणींनी उमरखेड येथील दिवाणी न्यायालयात खरेदीखत रद्द करून मालमत्तेचा ताबा मिळविण्यासाठी दावा दाखल केला.

या दाव्याचा निकाल १२ फेब्रुवारी १९९८ रोजी अतिश कदम यांच्या बाजूने लागला.

न्यायालयाने संबंधित खरेदीखत रद्द करून मालमत्तेचा ताबा देण्याचा आदेश दिला. या निर्णयाविरुद्ध प्रतिवादींनी नागपूर उच्च न्यायालयात अपील केले. मात्र, तेही फेटाळण्यात आल्याने दिवाणी न्यायालयाचा निर्णय कायम राहिला.

त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकरण जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे पाठविण्यात आले. महसूल प्रशासनामार्फत मरसुळ येथे प्रत्यक्ष वाटणीची कार्यवाही करण्यात आली. तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत २ जुलै २०२६ रोजी पोलिस पाटील व पंचांच्या उपस्थितीत अतिश कदम व इतरांना त्यांच्या हक्काच्या मालमत्तेचा ताबा देण्यात आला. त्यानुसार महसूल अभिलेखातही नोंद करण्यात आली.

अशा प्रकारे तब्बल २८ वर्षांनंतर संबंधित खरेदीखत रद्द होऊन वडिलोपार्जित मालमत्तेवरील हक्काची अंमलबजावणी झाली. या प्रकरणात अतिश कदम व इतरांच्या वतीने ॲड. प्रेमानंद माळवे यांनी काम पाहिले.

# सोलर केबल चोरीचा 'भंगार' धंदा उघड, दोघे ताब्यात : ६.८८ लाखांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**यवतमाळ** : जिल्ह्यातील सोलर प्लांटमधून सोलर केबल चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने आर्णी येथे कारवाई करीत केबल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून सुमारे ६ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ७ ऑगस्ट रोजी आर्णी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना सोलर केबल चोरीच्या गुन्ह्यात शेख अहमद शेख सादिक (३६, भंगार व्यापारी, रा. शास्त्रीनगर, आर्णी) आणि त्याच्या साथीदारांचा सहभाग असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार माहेर मंगल कार्यालय परिसरात पथकाने सापळा रचला. तेथे पांढऱ्या रंगाच्या स्कार्पिओ वाहनात दोघे संशयास्पदरीत्या आढळून आले. चौकशीदरम्यान त्यांची नावे शेख अहमद शेख सादिक आणि शेख कादर उर्फ कलीम शेख छोटू (२९, रा. अमराईपुरा, आर्णी) अशी निष्पन्न झाली. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये पॉलीकॅब कंपनीची चार एमएमची सुमारे दोन हजार मीटर सोलर केबल, तसेच वायर कटर, पकड आदी साहित्य आढळले.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी आणखी एका साथीदारासह हेटी, ता. आर्णी येथील सोलर प्लांट तसेच तुपटाकळी, ता. दिग्रस येथील सोलर प्लांटमधून केबल चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरी केलेली केबल जाळून त्यातील तांबे वेगळे करून भंगारात विकल्याची माहितीही त्यांनी दिली.

त्यानंतर शेख अहमद याच्या माहेर मंगल कार्यालयाजवळील 'हुमेरा स्क्रॅप' या भंगार गोदामाची झडती घेण्यात आली. तेथे स्टीलच्या डब्यात ठेवलेली २५ हजार रुपयांची रोकड मिळाली. ही रक्कम तुपटाकळी येथील सोलर केबल चोरीनंतर भंगार विक्रीतून मिळाल्याचे आरोपीने सांगितल्याने तीही जप्त करण्यात आली. या कारवाईत १ लाख ६२ हजार रुपयांची सोलर केबल, एक हजार रुपयांचे चोरीचे साहित्य, पाच लाख रुपये किमतीचे स्कार्पिओ वाहन आणि २५ हजार रुपये रोकड, असा एकूण ६ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे आर्णी आणि दिग्रस पोलिस ठाण्यात दाखल असलेले सोलर प्लांटमधील केबल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासासाठी आर्णी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असून, संबंधित पोलिस ठाण्यांकडून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक शिवशंकर दिनकर कायंदे, पोलिस अंमलदार सोहेल मिर्झा, मिथुन जाधव, सचिन मलाये, किशोर झेंडेकर, पवन ढवळे, अमित झेंडेकर, कविश पालेकर, दिगांबर पिलावन तसेच चालक जितेंद्र चौधरी यांनी केली.

# पालकमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर; अतिवृष्टीच्या नुकसानीची पाहणी

## पंचनामे पारदर्शकपणे करा, शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये : ना. संजय राठोड यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

प्रतिनिधी ९ ऑगस्ट





**यवतमाळ** : अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या भागाची पालकमंत्री संजय राठोड यांनी शनिवारी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. बाभूळगाव, नेर आणि दारव्हा तालुक्यांतील विविध गावांना भेटी देत त्यांनी पिकांचे नुकसान, खरडून गेलेली शेती तसेच पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेत धीर दिला.

अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे तातडीने आणि पारदर्शकपणे पूर्ण करावेत. पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांची यादी गावात प्रसिद्ध करावी. सर्वेक्षणातून एकही नुकसानग्रस्त शेतकरी सुटणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश राठोड यांनी तहसीलदार आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या दौऱ्यात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, तलाठी तसेच स्थानिक पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### आठ गावांत पाहणी

- पालकमंत्री राठोड यांनी बाभूळगाव तालुक्यातील मांगसावंगा, हस्तापूर, वाटखेड (बु.) आणि नांदुरा, नेर तालुक्यातील दगडधानोरा आणि मोझर तसेच दारव्हा तालुक्यातील डोल्हारी (शेंद्री) आणि दहेली या गावांना भेटी देऊन अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

### रस्ते, पूल, पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावांना हिरवा कंदील

- पाहणी दौऱ्यादरम्यान राठोड यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या आणि मागण्या जाणून घेतल्या. गावातील रस्ते, पूल आणि पाणंद रस्त्यांच्या दुरुस्ती अथवा नव्या कामांसाठी प्रस्ताव सादर करावेत. या प्रस्तावांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी ग्रामस्थांना दिले.

### 'खऱ्या नुकसानग्रस्तांनाच मदत मिळावी'

- नुकसानभरपाईसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करताना प्रत्यक्ष नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची अचूक नोंद घेणे आवश्यक आहे. खऱ्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनाच मदत मिळावी आणि एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घ्यावी. पंचनामा आणि सर्वेक्षणाच्या प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा, रुग्णांचे हाल

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**झरी** : तालुक्यातील मुकुटबन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधांचा तुटवडा जाणवत असल्याने परिसरातील गरीब व सर्वसामान्य रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ॲसिडिटीसारख्या सामान्य आजारांवरील औषधेही उपलब्ध नसल्याच्या तक्रारी रुग्णांकडून होत आहेत. त्यामुळे उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात येऊनही औषधे बाहेरून खरेदी करण्याची वेळ रुग्णांवर येत आहे.

शासकीय आरोग्य सेवा ही सर्वसामान्य नागरिकांना कमी खर्चात उपचार मिळावेत, या उद्देशाने उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र औषधांचा तुटवडा आणि आवश्यक उपचार वेळेवर न मिळाल्याने अनेक रुग्ण खासगी दवाखान्यांचा आधार घेताना दिसत आहेत. खासगी दवाखान्यांमध्ये तपासणी, सलाईन, औषधांच्या गोळ्या तसेच इतर उपचारांसाठी रुग्णांना मोठा खर्च करावा लागत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या काही रुग्णांना पुढील उपचारासाठी इतर ठिकाणी रेफर केले जाते, अशीही नागरिकांची तक्रार आहे.

मुकुटबन परिसरातील गरीब व गरजू नागरिकांना चांगली आरोग्यसेवा स्थानिक पातळीवरच मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधांचा नियमित पुरवठा करणे, उपलब्ध मनुष्यबळ व सुविधांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. संबंधित आरोग्य विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# मांडव्यात स्वातंत्र्यदिनाचा अनोखा उत्सव

## वेशभूषा, रांगोळी स्पर्धेत रोख बक्षिसांची लयलूट

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**दिग्रस** : स्वातंत्र्यदिनाचा उत्सव केवळ ध्वजारोहण आणि प्रभातफेरीपुरता मर्यादित न ठेवता देशभक्ती, संस्कार आणि भारतीय संस्कृतीचा जागर करण्यासाठी दिग्रस तालुक्यातील मांडवा येथे अनोखा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. ग्रामपंचायत मांडवा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्टला भव्य वेशभूषा व रांगोळी स्पर्धा होणार आहे.

वेशभूषा स्पर्धा प्रभातफेरीदरम्यान घेण्यात येणार असून छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासह कोणत्याही महापुरुषाची व थोर नेत्याची वेशभूषा करता येणार आहे. संबंधित व्यक्तिमत्त्वाचे कार्य थोडक्यात सांगणे आवश्यक राहणार आहे. प्रथम क्रमांकासाठी १,१११, द्वितीय १,००१, तर तृतीय क्रमांकासाठी ९०१ रुपयांसह अन्य क्रमांकांसाठीही रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

रांगोळी स्पर्धेत सर्व वयोगटातील नागरिकांना सहभागी होता येणार असून प्रभातफेरीच्या मार्गावर रांगोळी काढावी लागणार आहे. प्रथम क्रमांकासाठी १,१११, द्वितीय १,००१ आणि तृतीय ९०० रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. दोन्ही स्पर्धांमध्ये परीक्षकांचा निर्णय अंतिम राहणार आहे.

- **विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि गावात देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

# सुमित्रा गोडे यांची यवतमाळ जिल्हा महिला अध्यक्षपदी नियुक्ती

## मानवी हक्कांसाठी आवाज उठविण्याचा नवनियुक्त अध्यक्षांचा निर्धार

प्रतिनिधी ९ ऑगस्ट



**वणी** : मानवी हक्क सुरक्षा परिषदेच्या यवतमाळ जिल्हा महिला अध्यक्षपदी सौ. सुमित्रा नारायण गोडे यांची नियुक्ती करण्यात आली. वणी येथील शासकीय विश्रामगृहात ८ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजू धावंजेवार यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश संघटक परशुराम पोटे, विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष विकेश पानघाटे, वणी विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब आसुटकर, वणी शहर अध्यक्ष अजय चन्ने, तालुका अध्यक्ष सुनीता काळे, शहर महिला अध्यक्ष प्रमिला चौधरी यांच्यासह संजय चिंचोलकर, राजू जयस्वाल, सुनील इंदुवामन ठाकरे, प्रमोद लोणारे, आकाश दुबे तसेच परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नवनियुक्त जिल्हा महिला अध्यक्ष सुमित्रा गोडे यांनी सर्वसामान्य नागरिकांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराविरोधात संघटनेच्या माध्यमातून आवाज उठविण्याचा निर्धार व्यक्त केला. पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत वणी शहरातील महिलांसाठी प्रसाधनगृहांची अपुरी सुविधा, महिलांचे आरोग्य तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. महिलांच्या मूलभूत सुविधांसाठी संबंधित विभागाकडे निवेदन देऊन पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि मानवी हक्कांशी संबंधित प्रश्नांसाठी यापुढेही सातत्याने प्रयत्न करण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

सुमित्रा गोडे यांच्या नियुक्तीबद्दल परिषदेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकरी, भूमिहीन वन जमीनधारकांच्या प्रश्नांसाठी जेलभरो

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**यवतमाळ** : शेतकरी, कामगार, भूमिहीन वनजमीन कसणारे आणि आशा कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने सोमवारी (१० ऑगस्ट) देशव्यापी जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे. यवतमाळ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर, संविधान चौकात हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करावा, कर्जमाफी योजनेतील मयत लाभार्थ्यांच्या वारसांना सुलभ ई-केवायसीच्या माध्यमातून लाभ द्यावा, मागील वर्षीच्या पीकविम्याची रक्कम तातडीने वितरित करावी, यंदाच्या पीक दरपत्रकात दुप्पट वाढ करून त्यानुसार पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्या आंदोलनातून करण्यात येणार आहेत.

कामगारांच्या प्रश्नांवर चारही श्रमसंहिता व त्यांचे नियम रद्द करावेत, संघटित आणि असंघटित कामगारांना संघटना स्थापन करण्याचा अधिकार, नोंदणी व मान्यता द्यावी, आठ तासांचा कामाचा दिवस, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करावी, तसेच संप आणि सामूहिक वाटाघाटीचा अधिकार अबाधित ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

वनजमीन कसणाऱ्या अतिक्रमणधारकांना कोणत्याही दोन पुराव्यांच्या आधारे जमिनीचे पट्टे द्यावेत, चुकीच्या पद्धतीने अपात्र ठरविलेल्या दाव्यांची फेरतपासणी करावी, तसेच वनजमीन कसणाऱ्या गैरआदिवासींना तीन पिढ्यांची अट न लावता ७५ वर्षे वयाच्या ज्येष्ठ नागरिकाचा पुरावा ग्राह्य धरून पट्टे देण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

वन्यप्राण्यांपासून शेती आणि शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी छत्तीसगडच्या धर्तीवर जंगलाला तारेचे कुंपण करावे, अशी मागणी करण्यात आली.

आशा कर्मचाऱ्यांचे गेल्या तीन-चार वर्षांपासून प्रलंबित असलेले मानधन तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करावे, खासगी कंपन्यांना फायदा पोहोचविण्यासाठी स्मार्ट मीटरची सक्ती बंद करावी, दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला करणाऱ्या दोषी पोलिसांवर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांवर सूडबुद्धीने कारवाई करणे थांबवावे, या मागण्यांचाही आंदोलनात समावेश आहे.

या आंदोलनात शेतकरी, कामगार, प्रबुद्ध नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. कुमार मोहरमपूरी, ॲड. डी. बी. नाईक, चंद्रशेखर सिडाम, अनिता खुनकर, मनीष इसाळकर, देविदास मोहकर, उषा मुरखे, सुरेखा बिरकुरवार, रमेश मिरासे, गजानन ताकसांडे, किसन मोहुर्ले, कवडू चांदेकर, सदाशिव आत्राम, रामभाऊ जिद्देवार, पुंडलिक ढुमने आदींनी केले आहे.

# 'नमो उद्याना'वरुन सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

## साई श्रद्धानगरला विरोध; मर्जीतील लेआउटऐवजी मध्यवर्ती ठिकाणी उद्यान उभारण्याची मागणी

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**उमरखेड** : केंद्र सरकारच्या पायाभूत सुविधा योजनेअंतर्गत ढाणकी नगरपंचायतीला प्राप्त झालेल्या सुमारे एक कोटी रुपयांच्या निधीतून प्रस्तावित असलेल्या 'नमो उद्याना'च्या जागेवरून आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. साई श्रद्धानगर येथे उद्यान उभारण्यास स्थानिक रहिवाशांनी विरोध करीत उच्च न्यायालयात धाव घेतल्याने नगरपंचायत प्रशासनाकडून पर्यायी जागेचा शोध सुरू आहे. मात्र, मर्जीतील लेआउटमध्ये उद्यान उभारण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत असून, याला माजी नगराध्यक्ष सुरेश जयस्वाल यांनी आक्षेप घेण्याची भूमिका घेतली आहे.

### 'उद्यान शहराच्या मध्यवर्ती भागात असावे'

- कोरटवाड लेआउटऐवजी खरूस रस्त्यावरील किरण नगरी येथे 'नमो उद्यान' उभारण्याची मागणी प्रभाग क्रमांक तीनच्या नगरसेविका सारिका विनोद कांबळे यांनी केली आहे. किरण नगरी ही राज्य मार्ग क्रमांक २६२ लगत असून येथे ३० गुंठ्यांपेक्षा अधिक खुली जागा उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणापासून आठवडी बाजार अवघ्या शंभर मीटर अंतरावर असून शहरातील सुमारे दहा प्रभागांतील नागरिकांना या उद्यानाचा लाभ घेता येईल, असे त्यांचे म्हणणे आहे.

साई श्रद्धानगर येथे सुमारे एक कोटी रुपये खर्चून 'नमो उद्यान' उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाची कार्यादेशही देण्यात आला होता. मात्र, स्थानिक रहिवाशांनी या निर्णयाला विरोध करीत उच्च न्यायालयात धाव घेतल्याने उद्यानाच्या जागेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, २९ जुलै रोजी झालेल्या नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत गांजेगाव रस्त्यावरील कोरटवाड लेआउटमध्ये उद्यान हलविण्याबाबत चर्चा झाली. मात्र, हा विषय सभेच्या विषयसूचीत नसल्याने अध्यक्षांच्या परवानगीनेही तो निर्णय घेता येतो का, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने अद्याप प्रशासकीय मान्यता बदलण्याबाबत ठराव केल्याचे स्पष्ट झालेले नसून, यासाठी विशेष सभा बोलावली जाण्याची शक्यता आहे.

माजी नगराध्यक्ष सुरेश जयस्वाल यांनीही किरण नगरीच्या जागेचीच मागणी केली आहे. "शहराच्या विकासासाठी मिळालेला निधी नागरिकांच्या जास्तीत जास्त उपयोगी पडला पाहिजे. किरण नगरीमध्ये मोठी जागा, रस्त्याची सुविधा आणि आठवडी बाजाराची जवळीक असल्याने या ठिकाणी उद्यान झाल्यास नागरिकांना मोठा फायदा होईल. यासाठी आपण निश्चितच लढा देणार," असे जयस्वाल यांनी सांगितले. दरम्यान, उद्यानाच्या जागेवरून सुरू झालेला हा वाद आता न्यायालयीन प्रक्रियेसोबतच नगरपंचायतीच्या राजकारणातही रंगण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे 'नमो उद्याना'च्या जागेचा अंतिम निर्णय कोणत्या ठिकाणी होतो, याकडे ढाणकीवासीयांचे लक्ष लागले आहे.

# अतिक्रमणांवर हातोडा! रस्त्यांचा श्वास मोकळा; महापालिकेची धडक मोहीम

## शहरातील अतिक्रमणे काढून घ्या, अन्यथा बुलडोजर... ; महानगरपालिकेने दिला अल्टिमेटम

प्रतिनिधी ९ ऑगस्ट



**अमरावती :** शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आताही महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या अतिक्रमणांना रडारवर घेतलं आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.

मा. आयुक्त, महोदया यांच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्यावतीने अतिक्रमण मोहिम सुरू असून आज दिनांक,06/08/2026 रोजी, सकाळी,11.00 वाजता पासून ते सायंकाळी,5.30 वाजेपर्यंत जेसीपीद्वारे सिद्धार्थ नगर,येथील गैरअर्जदार श्री. अवि खिराडे , व इतर 21 नागरिकाद्वारे अनधिकृतपणे सार्वजनिक नालीवर पक्या स्वरूपाचे बांधकाम करून अतिक्रमण केले होते, सदर अतिक्रमणामुळे लगतचे परिसरामध्ये पावसाची पाणी साचून अडथळा निर्माण होत होता,सदर अतिक्रमण स्वतः काढून घेण्याबाबत संबंधित नागरिकांना पूर्व सूचना नोटीस देण्यात आली होती, परंतु सदर अतिक्रमण त्यांच्याद्वारे न काढल्यामुळे झोन क्र,2 बांधकाम विभाग व स्वच्छता विभाग व अतिक्रमण विभागाद्वारे संयुक्तपणे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात आली आहे जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा महानगरपालिका प्रशासन काढून घेईल. तसेच कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल असा इशारा अतिक्रमण पथक प्रमुख यांनी दिल्या. या इशाऱ्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठp येथील अतिक्रमणांवर देखील लवकरच कारवाई करणार असून त्याबाबत शहरातील इतर भागातील अतिक्रमणे मोकळे करून शहरातील मुख्य रस्त्यावरील /फूटपाथ वरील अतिक्रमणांवर कारवाई करणार असे महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त, यांनी सांगितले.

# धामोरी फाट्याजवळील खुनाचा छडा; दोन मुख्य आरोपींना अटक

## खोलापूर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी ९ ऑगस्ट



**अमरावती :** खोलापूर पोलीस ठाणे हद्दीतील ग्राम धामोरी फाट्याजवळ तरुणाचा खून करून पसार झालेल्या अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात खोलापूर पोलिसांना यश आले असून, या प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे.

खोलापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. 181/2026, कलम 103(1) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दिनांक 29 जुलै 2026 रोजी मृतक राहुल राजू रावकेकर (वय 35 वर्षे, रा. वाठोडा शुक्लेश्वर, ता. भातकुली, जि. अमरावती) हे आपल्या गावाकडून अमरावतीकडे जात असताना धामोरी बस स्टँडच्या अलीकडे धामोरी कुमागार यांच्या वाड्याजवळ अज्ञात इसमाने त्यांच्यावर चाकूने वार करून खून केला होता.

तांत्रिक तपासातून आरोपींचा माग काढला गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने विविध तांत्रिक बाबींचा सखोल तपास सुरू केला. या तपासादरम्यान इंटरनेट व टी.एस.पी. (टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर) कडून प्राप्त तांत्रिक माहितीच्या आधारे सुमारे 550 मोबाईल क्रमांकांचे विश्लेषण करण्यात आले.

तसेच घटनास्थळ व परिसरातील 61 ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहिती यांचे बारकाईने विश्लेषण करून संशयित आरोपींच्या हालचालींचा माग काढण्यात आला.

या तपासातून गुन्ह्यातील संशयित आरोपींची ओळख पटवून साहिल राहुल भगत, पियुष रंजित गायकवाड

यांना पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यातील इतर फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

> खोलापूर पोलिसांच्या तांत्रिक कौशल्य, सीसीटीव्ही विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या प्रभावी वापरामुळे अवघड असलेल्या खुनाच्या गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावण्यात यश आले आहे.
>
> **- अनुप बाकडे**
> सहाय्यक पोलीस निरीक्षक
> पोलीस स्टेशन खोलापूर,
> अमरावती ग्रामीण

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, दर्यापूर सतीश कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# मानवतेची भावना जोपासण्यासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी ९ ऑगस्ट




**अमरावती :** जीव वाचवते आणि स्वेच्छेने रक्तदान करण्याच्या महत्वाबाबत जागरूकता निर्माण करणे या उदात उद्देशाने, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती आणि अमरावती जिल्हा मद्य विक्रेता संघटना द्वारे शनिवार, १५ ऑगस्ट २२६ रोजी 'रुबी हॉल' वेण्ड मेहफिल, कॅम्प अमरावती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला तरुण, सामाजिक कार्यकर्ते विविध क्षेत्रातील व्यावसायिक आणि नागरिक अशा सर्व स्तरांतील रक्तदात्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे , शिबिरात एकूण २००० च्या वर रक्त बॉटल संकलित करण्यात येणार आहे. या रक्ताचा उपयोग आपत्कालीन वैद्यकीय उपचार, शस्त्रक्रिया अपघातावरील उपचार आणि जीवनरक्षक रक्तसंक्रमणाची गरज असलेल्या रुग्णांसाठी होणार आहे. यामध्ये पात्र डॉक्टर, तंत्रज्ञ आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे पथक रक्तदान प्रक्रिया सुरक्षित, आरोग्यदायी आणि कार्यक्षमतेने पार पाडणार आहे. रक्तदान करण्यापूर्वी प्रत्येक रक्तदात्याची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आणि रक्तदान केल्यानंतर त्यांना प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.

रक्त दान केलेल्या रक्ताचे एक युनिट अनेक जीव वाचवू शकते, तसेच नागरिकांना स्वेच्छेने रक्तदान करणे ही एक सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारण्याचे आवाहन करणार आहे. आयोजकांनी भविष्यातही अशा मानवतावादी उपक्रमांचे आयोजन करण्याबाबतची आपली कटिबद्धता पुन्हा व्यक्त केली आणि स्वेच्छेने रक्तदान करून वाचवण्याच्या या कार्यात सहकार्य करत राहण्याचे आवाहन जनतेला केले

"रक्तदान करा, जीव वाचवा तुमचे एक रक्तदान एखाद्या व्यक्तीला जीवनांची दुसरी संधी देऊ शकते." अशी माहिती उद्योजक नितीन देशमुख यांनी पत्र परिषद मध्ये दिली. अनिल भामरे, सचिन हिवसे दिपक गुडदे, विजय जयस्वाल,सुरेश चांदवानी., बाबुशेठ मेतानी गजानन राजगुरे, रोहीत खुराणा,जस्सी नंदा, राजेश अग्रवाल यांच्यासह इतरही पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पाक्षिक सभा उत्साहात संपन्न

## अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व संघटन विस्तारावर भर

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अमरावती:** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती जिल्हा व शहर शाखेची पाक्षिक सभा गुरुदेव सेवाश्रम, राधा नगर येथे उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि विचारमंथनात्मक वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाउपाध्यक्ष डॉ. सतीश तराळ होते. राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हाउपाध्यक्ष प्रमोद कोळमकर, संविधान जागर विभागाचे राजीव बसवनाथे, तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते लक्ष्मण तडस आणि नरेंद्र धर्माळे उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी विस्तारित जिल्हा कार्यकारिणी बैठकीतील निर्णय, विविध शाखांचे अहवाल, संघटनात्मक वाटचाल आणि आगामी उपक्रमांची दिशा यांचे सविस्तर वाचन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा व शहर शाखेने राबविलेल्या विविध सामाजिक, प्रबोधनात्मक आणि जनजागृती उपक्रमांचा आढावा घेऊन आगामी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.

बैठकीत महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि काळी जादू प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासनाशी समन्वय वाढविणे, अंधश्रद्धाविरोधी मोहिमा अधिक व्यापक स्वरूपात राबविणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे आणि विवेकवादी विचार गावागावात पोहोचविणे याबाबत ठोस भूमिका घेण्यात आली.

यासोबतच नवीन शाखा स्थापन करून संघटन विस्ताराला गती देणे, ९ ऑगस्ट रोजी गुरुदेव सेवाश्रम येथे "तुकडोजी महाराज आणि अंधश्रद्धा निर्मूलन" या विषयावर परिसंवाद आयोजित करणे, बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद, लेखन-वाचन कार्यशाळा तसेच विविध जनजागृती उपक्रमांचे नियोजन करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

यावेळी अमरावती शहर शाखेचे नवनियुक्त अध्यक्ष मिलिंद तायडे यांचा अनिप वार्तापत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. तसेच अनिप वार्तापत्राच्या पाच वर्षांच्या यशस्वी प्रवासानिमित्त दोन नवीन वर्गणीदार नोंदविण्यात आले. आगामी काळात वार्तापत्राचे अधिकाधिक वर्गणीदार करून विवेकवादी विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

उपस्थित वक्त्यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि अवैज्ञानिक प्रथांविरोधातील लढा अधिक व्यापक करण्यासाठी प्रत्येक गावात संघटन बळकट करण्याचे आवाहन केले.

# घार पक्षाला जीवदान

## पुन्हा चायना मध्ये ठरत आहे घातक



**अमरावती:** चपराशी पुरा आज सकाळी सुमारे नऊ वाजता सुमारास चपराशी पुरा येथील पिंपळाच्या झाडाला चायना मांजा मुळे जखमी घारपक्षी अडकलेला होता.

त्याला समाजसेवी राजाभय्या चौधरी यांनी बांबूच्या साह्याने सुखरूप खाली उतरविले. त्याला प्राथमिक उपचार दिले परंतु तो उडण्याच्या परिस्थितीमध्ये नसून त्याला सध्या राजाभय्या चौधरी यांनी आपल्या निवासस्थानी देखरेखी मध्ये ठेवण्यात आले.

दोन दिवसानंतर उडण्याच्या परिस्थितीमध्ये आल्यावर त्याला आकाशामध्ये उडण्याकरिता सोडण्यात येईल.

# कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या विचारांचा चालता-बोलता वारसदार हरपला

## खासदार डॉ.अनिल बोंडे यांची बापूसाहेबांना आदरांजली...

प्रतिनिधी ९ ऑगस्ट



**अमरावती:** 'नागरवाडी' इंद्रभुवनचे शिल्पकार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा गाडगेबाबा मिशनचे केंद्रीय उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांच्या निधनाची वार्ता अत्यंत वेदनादायी आणि मन हेलावून टाकणारी आहे.

ऐश्वर्याचा त्याग करून कर्मयोगी संत गाडगेबाबांची दशसूत्री आयुष्यभर जगणारे बापूसाहेब हे निष्ठावंत समाजकारणाचे मूर्तिमंत उदाहरण होते. ओसाड अन् दुर्गम असलेल्या नागरवाडीचा कायापालट करून गाडगेबाबांचा "नागरवाडीचे इंद्रभवन करा" हा मूलमंत्र त्यांनी प्रत्यक्षात सत्यात उतरवला.

त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्राची कधीही भरून न निघणारी मोठी हानी झाली आहे. एक अत्यंत तत्त्वनिष्ठ आणि ऋषितुल्य मार्गदर्शक आज आपल्यातून निघून गेला.

बापूसाहेबांच्या पवित्र स्मृतीस आणि जीवनकार्यास विनम्र अभिवादन! ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्रदान करो आणि देशमुख कुटुंबियांसह त्यांच्या असंख्य अनुयायांना या दुःखातून सावरण्याची श्री.गाडगेबाबा शक्ती देवो.

# पावसाच्या खंडात सोयाबीन उत्पादकांनी घाबरु नये; कृषी संशोधन केंद्राचा सल्ला

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्ह्यात जून अखेरीस पेरणी झालेल्या सोयाबीन पिकाची अवस्था सध्या 12 ते 15 दिवसांची असून, गेल्या 5 ते 6 दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता, कोणत्याही महागड्या फवारण्या न करण्याचे आवाहन अमरावती प्रादेशिक संशोधन केंद्र ( डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ) मार्फत कळविण्यात आले आहे.

या संवेदनशील काळात जमिनीतील ओलावा टिकवणे आणि मुळांची वाढ चांगली ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जमीन वाफशावर असल्यास शेतकऱ्यांनी उथळ डवरणी व कोळपणी करावी; ज्यामुळे वरचा पापुद्रा फुटून तणांचे नियंत्रण होईल आणि जमिनीतील ओलावा टिकून राहील. संरक्षित सिंचनाची सोय असल्यास व रोपे दुपारी कोमेजू लागल्यास हलके स्प्रिंकलर सिंचन द्यावे. 3-4 दिवसांच्या खंडासाठी टॉनिक किंवा 19:19:19 ची गरज नाही, मात्र पाण्याचा ताण 7 ते 10 दिवसांपेक्षा वाढल्यास 1 टक्के पोटॅशियम नायट्रेट किंवा 19:19:19 ची सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करावी. तीव्र ताण व जास्त तापमान असताना तणनाशकांचा वापर टाळावा. दुसरीकडे, ज्या भागात अत्यल्प पावसामुळे अद्याप पेरणी झालेली नाही, तिथे उशिरात उशिरा 23 जुलैपर्यंत सोयाबीन पेरता येईल. मात्र, यामुळे उत्पादनात 15 ते 20 टक्के घट होऊ शकते. अशा वेळी जे एस 20-34, जे एस 95-60, पिडीकेव्ही अंबा, एमएयूएस 725 यांसारख्या लवकर येणाऱ्या वाणांची निवड करावी.

# पोलीस स्टेशनच्या तात्काळ कारवाईमुळे बेपत्ता तीन मुली सुखरूप

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अमरावती:** राजापेठ पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे दि. 08/08/2026 रोजी फिर्यादी सारिका बलदेव गायकवाड यांच्या तक्रारीवरून त्यांच्या तीन मुली बेपत्ता झाल्याप्रकरणी गुन्हा क्र. 732/2026, कलम 137(2) भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तक्रार प्राप्त होताच राजापेठ पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. सी.आर. मोबाईल पथक, पोलीस कर्मचारी तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे विविध ठिकाणी शोध घेण्यात आला.

या शोधमोहीमेदरम्यान तांत्रिक पुराव्याने बेपत्ता झालेल्या तिन्ही मुली परतवाडा बस स्टॅन्ड येथे सुखरूप मिळून आल्या असून त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याची आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

प्राथमिक चौकशीत मुली सुरक्षित असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांच्या बेपत्ता होण्यामागील कारणांचा तसेच प्रकरणातील सर्व बाबींचा सखोल तपास सुरू आहे. आवश्यकतेनुसार त्यांचे जबाब नोंदवून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

> **नागरिकांना आवाहन**
>
> अल्पवयीन मुले-मुली बेपत्ता झाल्याची घटना घडल्यास वेळ न दवडता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी. वेळेवर दिलेल्या माहितीमुळे शोधमोहीम अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होते.

> **कार्यवाही अधिकारी**
>
> सदर कार्यवाही पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मीनाक्षी बोचे, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत चिपडे, पोलीस उपनिरीक्षक रोशन चटे व LHC ज्योती ढवळे या राजापेठ पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# गाईचेशेण व निर्माल्यापासून खडू व रांगोळी निर्मिती

## शिक्षक- विद्यार्थ्यांनी संशोधनात रुची वाढवावी- प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

### प्रा . गजानन भारसाकळे यांचे संशोधन कार्य



**दर्यापूर:** विज्ञाननिष्ठ प्रगतीच्या उन्नत कार्यात महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांनी शिक्षण घेत असतांना समाज उपयोगी संशोधन निर्मिती करावी असे मौलिक प्रतिपादन स्थानिक बाभूळगांव येथील शिवाजी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत थोरात यांनी सिव्हील इंजिनिअरींग विभागातील प्राध्यापक गजानन भारसाकळे यांच्या पर्यावरण पूरक खडू व रांगोळी निर्मितीच्या शुभारंभ कार्यास शुभेच्छा देतांना तथा या प्रयोगासाठी लागणारे यंत्र स्वाधिन करतांना केले . गाईचे शेण व धार्मिक स्थळावरील निर्माल्य यांचे मिश्रण पावडर स्वरूपात तयार करून यामध्ये आवश्यक सहज उपलब्ध नैसर्गिक घटक वापरून ही संशोधित दैनंदीन उपयोगाची निर्मिती केली जाणार आहे . या संशोधनाबाबत प्रा . गजानन भारसाकळे यांना केंद्र शासनाच्या पेंटेट व कॉपी राईट विभागातून कॉपी राईट प्राप्त असून तयार होणाऱ्या खडू व रांगोळी यावर पेटेंट मागणी करणार असल्याचे प्रा . भारसाकळे यांनी संकेत दिले आहेत . विविध संस्था यांच्या वतीने पर्यावरण पुरस्कार प्राप्त असणाऱ्या प्रा . भारसाकळे यांना गाईच्या शेणापासून प्रभावी खत निर्मितीसाठी कॉपी राईट तथा शेणापासून गोवरी निर्मितीसाठी उपयुक्त मशीन यावर नुकतेच कॉपी राईट व डिझाईन पेंटेंट सुद्धा मिळालेले आहे ही बाब इथे महत्वपूर्ण ठरत आहे . अमरावती जिल्ह्यातील तथा दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे) परीसरातील सुप्रसिद्ध गाडगेबाबा गोरक्षण संस्थेचे प्रा . भारसाकळे हे संस्थापक संचालक असून याच विषयांवर त्यांचे शोध निबंध हे देश - विदेश पातळीवर प्रसिद्ध झालेले आहेत हे इथे उल्लेखनिय ठरते . या यशप्राप्तीमुळे ते कार्यरत असलेल्या श्री. शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालया च्या लौकिकात भर पडली असून गोसेवेतील या समाज उपयोगी अतुलनीय संशोधन कार्याबाबत प्रा . गजानन भारसाकळे यांच्यावर सर्वबाजूंनी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . याप्रसंगी एस क्यूब एम टी प्रा . लि पुणे या कंपनीचे सीईओ चेतन सायनकर व सौ पल्लवी सायनकर यांचेसह प्राचार्य डॉ प्रशांत थोरात , डॉ मंदार देशमुख, डॉ गोपाल झामरे, डॉ आनंद ताथोड, प्रा . अमीत गावंडे, डॉ सतीश खेडकर, डॉ अमीत गावंडे, प्रा . राहूल वातीले, प्रा . आदित्य गणगणे व प्रा. दुश्यन झामरे इत्यादी महाविद्यालयातील विभाग प्रमुख तथा प्राध्यापक वृंद व महाविद्यालयीन माजी विद्यार्थी संघटना पदाधिकारी यांची उपस्थिती होती .

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार, दि.९ ऑगष्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## प्लास्टिकचे राष्ट्रध्वज वापरणे टाळा; ध्वजसंहितेचे काटेकोर पालन करा

**वाशीम :** स्वातंत्र्यदिनानिमित्त अनेक विद्यार्थी व लहान मुले प्लास्टिकपासून तयार केलेले लहान राष्ट्रध्वज खरेदी करतात. मात्र, कार्यक्रमानंतर हे ध्वज अनेकदा रस्त्यावर, मैदानात किंवा इतर ठिकाणी टाकून दिले जातात. प्लास्टिकचे ध्वज सहज नष्ट होत नसल्याने ते दीर्घकाळ पडून राहतात आणि नकळत राष्ट्रध्वजाचा अवमान होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे प्लास्टिकपासून बनविलेल्या लहान राष्ट्रध्वजांची विक्री व वापर टाळावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त शासकीय, निमशासकीय कार्यालये, प्रतिष्ठाने, प्राधिकरणे तसेच इतर सर्व संस्थांनी ध्वजारोहण करताना भारतीय ध्वजसंहितेतील तरतुदींचे काटेकोर पालन करावे. वापरास अयोग्य, फाटलेले, जीर्ण किंवा खराब झालेले तसेच सार्वजनिक ठिकाणी पडलेले राष्ट्रध्वज गोळा करून त्यांची सन्मानपूर्वक विल्हेवाट लावण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे.अशा राष्ट्रध्वजांचे संकलन करून तालुका स्तरावर संबंधित तहसील कार्यालयात, तर जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावेत. या उपक्रमात सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय व निमशासकीय कार्यालये, स्वयंसेवी संस्था, पालक तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही जिल्हाधिकारी यांनी आवाहनात म्हटले आहे.

## आंदोलनातून मिळेना न्याय, दिव्यांगावर १८ वर्षापासून अन्याय...

# शासकीय धोरण, त्रास विनाकारण, शेतकऱ्यांचे मरण !

### * सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत * आता १५ ऑगस्टला नाही राहायचे जीवंत...


खोटी खरेदी व गट नंबरची 'फिरवाफिरवी'!
दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांचा मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न
सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत!




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथील दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांची शेतजमीन अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चोरली आहे. ती परत मिळविण्यासाठी गेल्या १८ वर्षापासून लोकशाही व्यवस्थेनुसार प्रशासनाशी लढत आहेत. निवेदन, आंदोलन, उपोषण करून न्याय मिळत नसल्याने दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांना याची खंत नाही. त्यामुळे जीवंतच राहायचे नाही असे त्यांनी ठरविले आहे. ते १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहेत. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासकीय धोरणामुळे दिव्यांग शेतकऱ्याला विनाकारण त्रास होवून मरण यातना भोगाव्या लागत आहे.**

दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांची शेती १८ वर्षापूर्वी तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व काही गावातील प्रतिष्ठांनी संगणमत करून कागदोपत्री चोरली. या सर्वांचे पुरावे असूनही न्याय न मिळाल्याने निवेदन ,आंदोलन , उपोषण दरवर्षी दरदिवशी दिव्यांग शेतकरी लढा देत आहेत. गेल्या वर्षीही दिवाळीला त्यांनी पोस्टरव्दारे त्यांनी 'आमची सहनशिलता संपली, उखाळ्या, पाखाळ्या, कुरघोड्या बंद करा, शेतकऱ्यांना भिक नको कुत्रे आवरा, रक्षकच झाले भक्षक, जिल्हयातील भ्रष्टाचारी प्रशासनाचा नंगानाच बंद करा' अशी वाक्ये लिहून पोस्टर प्रदर्शनातून आंदोलन केले होते. यासोबतच 'न्याय देता का कधी भेटु?' असा सवालही या पोस्टरव्दारे बाबुराव वानखडे प्रशासनाला विचारला होता.

यासंदर्भात त्यांनी याआधी वेळोवेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथे ५४/२ हा गट क्रमांक अस्तित्वातच नाही. मात्र शासकीय रेकॉर्डमध्ये अस्तित्वातच नसलेल्या गट क्रमांकाची तहसिल प्रशासन आणि पटवारी ससाने, ज्ञानेश्वर पवार, आर. आर. बोरकर यासह सर्वसंबंधीतांनी संगनमताने निर्मिती करुन त्याव्दारे शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणातील मौजे अंचळ येथील मुख्य सुत्रधाराला अटक करण्यात यावी. तसेच आपण शासकीय कागदपत्रानुसार गट क्रमांक दाखविणाऱ्यास १० लाख रुपयाचे रोख बक्षीस देवू अशी घोषणाहर दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी केली आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, मौजे अंचळ येथे गट नंबर ५४/२ हा नाही. परंतु ५४/२ हा बोगस गट नंबर तयार केला आहे. सदर शेतजमिनीवर हा गट नंबरच अस्तित्वात नाही. मी अंचळ येथील दिव्यांग व अशिक्षीत शेतकरी असून अंचळ शेतशिवारात गट २४१ व शेत सर्वे ५४/२ अधिक ३ मध्ये १३ एकर ४ गुंठे मालकीची शेतजमीन आहे. मात्र भूमि अभिलेख कार्यालय रिसोड यांनी शेत सर्वे ५४/२ मधील रेकॉर्डची फिरवाफिरवी करुन शेत सर्वे ५४/४ मधील लक्ष्मण अर्जुना भंगी यांची जमीन वाढविली.

या प्रकरणात आश्रु वानखेडे, सिताराम वानखेडे, तुकाराम वानखेडे, नारायण भंगी, हरिभाऊ भंगी यांच्यासह पटवारी सिताराम वानखेडे केनवड, पटवारी लोभाजी धोत्रे मानोरा, तत्कालीन तहसिलदार, तत्कालीन मंडळ अधिकारी हे सहभागी असल्याचा आरोप बाबुराव वानखेडे यांनी निवेदनाव्दारे केला आहे. तसेच पटवारी ससाने यांना जमिनीचा नकाशा सुध्दा समजत नाही. यातील सहभागी मुख्य सुत्रधाराने १० एकर जमिनीची १०० एकर कशी वाढविली याचीही चौकशी झाली पाहीजे.

या प्रकरणी माझी जमीन मला परत



मिळण्यासाठी मी गेल्या बारा वर्षापासून तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री आदींना असंख्य वेळा निवेदने दिली आहेत. मात्र माझ्या निवेदनाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कचऱ्याची टोपली दाखविली व मला न्याय मिळाला नाही. यासदंर्भात केलेल्या उपोषणात केवळ कोरडी आश्वासने देण्यात आली. तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्य सुत्रधारांना अटक करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग शेतकरी वानखेडे यांनी केली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी व प्रशासनाने शासनाच्या लेखी असलेला बोगस ५४/२ हा गट नंबर दाखवून द्यावा. गट नंबर दाखवून देणाऱ्याला आपण ताबडतोब १० लाख रुपयाचे बक्षीस देवू असे आवाहन वानखेडे यांनी प्रशासनाला केले आहे. त्यामुळे आता १५ ऑगस्ट रोजी पुन्हा आत्मदहन करणार असल्याचा इशाराही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.


सेवा पंधरवाड्यात मिळेल का न्याय!
गट नंबर दाखवा, ५ लाख रुपये बक्षीस मिळवा!
दिव्यांग शेतकऱ्याची कागदोपत्री जमीन चोरली!
अंचळ येथे जमीन कमी व सातबारा जास्त घोटाळा
दिव्यांग शेतकऱ्यावर १४ वर्षापासून अन्याय!

## थोडक्यात

### एक दिवसीय स्काऊट-गाईड प्रशिक्षण



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल.सपकाळ कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले एक दिवसीय स्काऊट-गाईड प्रशिक्षण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य सुनील सपकाळ यांनी जिल्हा समन्वयक श्री. केरसिंग पवार सर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी पालक समितीचे अध्यक्ष श्री. दिलीप अवगण यांची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हा समन्वयक श्री. केरसिंग पवार सर यांनी विद्यार्थ्यांना स्काऊट-गाईडच्या विविध उपक्रमांचे, कौशल्यांचे व शिस्तीचे मार्गदर्शन केले.तसेच लांभाडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला योग्य दिशा दिली. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, स्वावलंबन, संघभावना आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होण्यास मोलाची मदत झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी व कौतुकास्पद ठरला.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

### तडजोडीस पात्र प्रलंबित व वाद दाखलपूर्व प्रकरणे आपसी तडजोडीतून निकाली काढण्याची संधी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबित तसेच वाद दाखलपूर्व प्रकरणे आपसी तडजोडीतून निकाली काढण्यासाठी १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. पक्षकार, अधिवक्ता आणि नागरिकांनी या लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम यांनी केले आहे.




न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी सामंजस्यातून निकाली काढण्यासाठी लोक अदालत हे प्रभावी माध्यम ठरले आहे. लोक अदालतीच्या माध्यमातून प्रकरणे निकाली निघाल्यामुळे पक्षकारांचा वेळ, खर्च आणि मानसिक त्रास कमी होतो. तसेच दोन्ही पक्षकारांमधील संबंध सलोख्याचे राहण्यास मदत होते. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठीही लोक अदालत उपयुक्त ठरत आहे. येत्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात दाखल असलेली तडजोडीस पात्र प्रलंबित प्रकरणे, दिवाणी दावे तसेच वाद दाखलपूर्व तडजोडीस पात्र प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्येही राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.लोक अदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळते. पक्षकारांच्या संमतीने आणि दोन्ही बाजूंना मान्य असलेल्या अटींवर तडजोड केली जाते. त्यामुळे तडजोडीस पात्र प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम तसेच तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी व फौजदारी न्यायालय, मंगरूळपीर, कारंजा, मालेगाव, मानोरा आणि रिसोड येथे संपर्क साधावा, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## महिलांनी उद्योजिका होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे !

### *जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांचे प्रतिपादन
### *लोकसंचालित साधन केंद्र वाशिमची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेत उद्योजकतेकडे वाटचाल करावी. सत्ता, संपत्ती आणि समान संधी हे महिला आर्थिक विकास महामंडळाचे ब्रीदवाक्य असून, महिलांना न्याय्य संधी मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा समन्वय अधिकारी वर्षा खोब्रागडे यांनी केले.

लोकसंचालित साधन केंद्र, वाशिमची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री विठ्ठलवाडी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.सभेत केंद्राच्या अध्यक्षा सविता सुनील चौधरी यांनी सन २०२५–२६ या वर्षाचा कामकाजाचा आढावा तसेच सन २०२६–२७ साठीचे नियोजन सादर केले.यावेळी नाबार्डचे जिल्हा प्रबंधक शंकर कोकडवार यांनी महिलांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ घेऊन लघु तसेच मोठे उद्योग उभारावेत, असे सांगितले. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आकर्षक पॅकेजिंग, लेबलिंग आणि ब्रँडिंग करून विक्री व्यवस्थेला बळकटी द्यावी, असे त्यांनी नमूद केले.पीएमएफएमई योजनेचे श्री. मुठाळ यांनी योजनेची माहिती देत महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या योजनेअंतर्गत ३५ टक्के अनुदानाची तरतूद असून, पात्र महिलांनी योजनेचा लाभ घेऊन उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले.बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकांनी महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लोकसंचालित साधन केंद्र आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यातील सामंजस्य कराराच्या माध्यमातून महिलांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे सांगितले.

पोकरा योजनेचे सोहम बेलोकर यांनी पोकरा २.० अंतर्गत गावांसाठी उपलब्ध विविध योजनांची माहिती दिली. या योजनांमध्ये अनुदानाची तरतूद असून, महिला बचत गटांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन आर्थिक उपक्रमांना चालना द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

सभेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योजिकांचा, उत्कृष्ट सीआरपी तसेच गाव विकास समितीचा सत्कार करण्यात आला. यावेळी माविमचे लेखाधिकारी संकेत महाजन, वैभव काळमेघ, पुरुषोत्तम हातोलकर, राहुल मोकळे, प्रमोद गोरे, साधना मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी केंद्र व्यवस्थापक, लेखापाल, उपजीविका सल्लागार, सहयोगिनी, सीआरपी तसेच एफपीओ व्यवस्थापक व लेखापाल यांनी परिश्रम घेतले.

### बातमी खास दखल हमखास, सिटी न्यूज सुपरफास्ट...

## गंजलेल्या धोकादायक पोलला अखेर 'निरोप',

# महावितरणने बसवला नवीन विद्युत पोल!

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

**केनवडमध्ये सिटी न्यूज सुपरफास्टच्या बातमीने पुन्हा एकदा प्रशासनाला जागे केले आहे. भरवस्तीत नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या जीर्ण विद्युत पोलचा मुद्दा सिटी न्यूज सुपरफास्टने दि. ५ ऑगस्ट रोजी ठळकपणे मांडला आणि बातमी प्रकाशित होताच संबंधित यंत्रणेने तातडीने दखल घेतली. अखेर धोकादायक पोल हटवून त्याठिकाणी नवीन विद्युत पोल बसविण्यात आला असून, सिटी न्यूज सुपरफास्टच्या वृत्ताची दणदणीत दखल झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**


बुधवार, दि.५ ऑगष्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
पोल गंजला, धोका वाढला; महावितरणचा कारभार झोपला!
भरवस्तीत जीर्ण विद्युत पोलमुळे नागरिकांचा जीव धोक्यात; दुर्घटनेनंतरच महावितरण जागे होणार का?

'पोल गंजला, धोका वाढला; महावितरणचा कारभार झोपला! भरवस्तीत जीर्ण विद्युत पोलमुळे नागरिकांचा जीव धोक्यात; दुर्घटनेनंतरच महावितरण जागे होणार का?' या मथळ्याखाली सिटी न्यूज सुपरफास्टने दि. ५ ऑगस्ट रोजी केनवड येथील प्रभाग क्रमांक ३ मधील लादे यांच्या घराजवळील जीर्ण व धोकादायक विद्युत पोलचा प्रश्न ठळकपणे मांडला होता.सिटी न्यूज सुपरफास्टच्या वृत्ताची अखेर संबंधित यंत्रणेने गांभीर्याने दखल घेतली असून, धोकादायक ठरलेला जीर्ण विद्युत पोल काढून त्या ठिकाणी नवीन पोल बसविण्यात आला आहे. त्यामुळे भरवस्तीत निर्माण झालेला संभाव्य धोका आता दूर झाला असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.पोलच्या तळाला मोठ्या प्रमाणात गंज लागून तो जीर्ण झाला होता. त्याच्या पायथ्यालगत सांडपाणी वाहत असल्याने पोलच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर बनला होता. भरवस्तीतील या मार्गावर नागरिकांसह लहान मुलांची सतत ये-जा असल्याने पावसाळ्यात जोरदार वारा अथवा मुसळधार पावसात पोल कोसळण्याची भीती व्यक्त केली जात होती.विशेष म्हणजे, २३ जून रोजी केनवडमध्ये वीज दुर्घटनेत २० वर्षीय संकेत संतोष खराटे याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर भरवस्तीत असलेला जीर्ण पोल हा नागरिकांच्या सुरक्षेसाठी गंभीर इशारा ठरत होता. त्यामुळे सिटी न्यूज सुपरफास्टने हा मुद्दा केवळ बातमी म्हणून न मांडता नागरिकांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न म्हणून प्रशासनासमोर आणला.वृत्त प्रकाशित होताच संबंधित यंत्रणा सक्रिय झाली आणि धोकादायक पोलच्या ठिकाणी नवीन विद्युत पोल उभारण्यात आला. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळण्यास मदत झाली आहे.जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे आणि त्या समस्यांची दखल होईपर्यंत आवाज उठवणे, हीच पत्रकारितेची खरी ताकद आहे. केनवडमधील जीर्ण विद्युत पोलच्या प्रकरणातही त्याचा प्रत्यय आला.बातमी प्रकाशित झाली... यंत्रणा जागी झाली... जीर्ण पोल. हटला... आणि नवीन पोल उभा राहिला!हीच आहे 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या बातमीची दखल - खास दखल, हमखास दखल!



### धोकादायक बातमी दाखवली, यंत्रणा हलवली!

सिटी न्यूज सुपरफास्टने जीर्ण पोलचा धोका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधित यंत्रणेने तातडीने कार्यवाही केली. नवीन पोल बसविण्यात आल्याने संभाव्य दुर्घटनेचा धोका कमी झाला आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर वृत्तपत्राने केलेल्या पाठपुराव्याचे हे यश मानले जात आहे. गावकऱ्यांनी सिटी न्यूज सुपरफास्टचे आभार मानले.

## पशूधनाचे लसीकरण शिबीर!



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थिनीद्वारे ग्रामीण कृषी कार्यानुभवँ कार्यक्रम अंतर्गत घोटा येथे पशू लसीकरण करण्यात आले. शिबिरामध्ये साहाय्यक पशूवैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील गायी, म्हशी, बैल व विविध संसर्गजन्य रोगांना संरक्षण मिळावे यासाठी लसीकरण करण्यात आले.

यावेळी शेतकऱ्यांना नियमित लसीकरणाचे महत्त्व, पशूंची स्वच्छता, संतुलित आहार, रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आले. विद्यार्थिनींनी लसीकरण नोंदणी, जनजागृती, पशूपालकांना माहिती देणे आणि शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.शिबिराचे नियोजन कृषी महाविद्यालयाचे मार्गदर्शक तथा कीटकशास्त्रज्ञ डॉ .राजेश डवरे, प्राचार्य डॉ. आशिष अप्तूलकर ,उपप्राचार्य डॉ. पी. जी. देव्हडे सर, तसेच महाविद्यालयाचे पशूवैद्यकीय शाखेचे प्राध्यापक प्रा. कृष्णा देशमुख यांनी शिबिराचे नेटके नियोजन केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी प्रांजल इंगोल, गायत्री मोरे, आदित्य लाटे, आदित्य मोरे उपस्थित होते.

# कर्जमाफीत शेतकऱ्यांचे नाव आले; मात्र 'ई-केवायसी'चे घोडे अडले

## आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांची धावपळ : सर्व्हर डाऊन, बायोमेट्रिकची अडचण!

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**खामगाव :** राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी आता आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) अनिवार्य करण्यात आले आहे. यापूर्वी मोबाइलवर ओटीपीद्वारे होणारी ई-केवायसी प्रक्रिया बंद करण्यात आली असून, आता ॲग्रीस्टॅक नोंदणीसह बँक किंवा आपले सरकार सेवा केंद्रात प्रत्यक्ष बायोमेट्रिक पद्धतीने प्रमाणीकरण करावे लागत आहे. कर्जमाफीच्या यादीत नाव आलेल्या अनेक शेतकऱ्यांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी सर्व्हर डाऊन, इंटरनेट रेंजचा अभाव, बोटांचे ठसे न जुळणे किंवा आयरिस स्कॅनमध्ये अडथळे येत आहेत. त्यामुळे लाभमिळण्यापूर्वीच शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ होत आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले असून, संबंधित बँकांना लवकरात लवकर खरीप पीक कर्ज वाटप करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तत्काळ खरीप पीक कर्ज वाटपाचे निर्देश राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

कशी करायची केवायसी ? शेतकऱ्यांना बँक किंवा आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई-केवायसी करता येते. यासाठी आधार कार्ड, मोबाइल क्रमांक आणि संबंधित कर्ज खात्याची माहिती आवश्यक असते. ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रियाही पूर्ण करावी

### ई-केवायसीसाठी पैसे मागितल्यास करा तक्रार!

ई-केवायसी प्रक्रिया मोफत असतानाही काही ठिकाणी सेवा केंद्रांकडून शुल्क आकारले जात असल्यास त्याची तक्रार करता येते. जिल्ह्यातील नागरिकांना याबाबत तहसील कार्यालय, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार करता येऊ शकते. कधी सर्व्हर डाऊन तर कधी बायोमेट्रिक जुळेना! ई-केवायसी करताना सर्व्हरची समस्या वारंवार निर्माण होत आहे. काही शेतकऱ्यांचे बोटांचे ठसे जुळत नसल्याने प्रक्रिया अपूर्ण राहत आहे. वयोवृद्ध शेतकऱ्यांना या तांत्रिक अडचणींचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

### कर्जमाफीसाठी आधार प्रमाणीकरण बंधनकारक!

कर्जमाफी योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. ई-केवायसी झाल्यानंतरच संबंधित शेतकऱ्याचा लाभ निश्चित केला जात आहे. मोबाइल ओटीपीऐवजी आता बायोमेट्रिक प्रमाणीकरणाची पद्धत लागू करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई-केवायसी करीत आहेत. मात्र, काही ठिकाणी नेटवर्क नसल्याने त्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

# अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत शेतकऱ्यांच्या 'सिबिल'चे संरक्षण महत्त्वाचे!

## राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा व्यवस्थापकांशी प्रेमलता सोनोने यांची सकारात्मक चर्चा

प्रतिनिधी ९ ऑगस्ट



**मलकापुर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेची पहिली यादी जाहीर झाल्यानंतर शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ न देता पारदर्शक व शेतकरीहिताचे धोरण राबविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करत अस्तित्व संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा प्रेमलता सोनोने यांनी शहरातील राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा व्यवस्थापकांशी सकारात्मक चर्चा केली.

यावेळी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान शेतकऱ्यांच्या येणाऱ्या अडचणी, बँकांची भूमिका आणि शासनाच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. शासनाने ही योजना लागू करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असला, तरी त्याचा लाभ प्रत्यक्षात कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळणे तितकेच आवश्यक असल्याचे सोनोने यांनी नमूद केले.

विशेषतः कर्जमाफीची प्रक्रिया 'वन टाइम सेटलमेंट (OTS)' स्वरूपात राबविल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या सिबिल स्कोअरवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याची बाब त्यांनी बँकांच्या निदर्शनास आणून दिली. सिबिल खराब झाल्यास भविष्यात शेती, सिंचन, शिक्षण किंवा इतर आवश्यक कारणांसाठी शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कर्जमाफीची नोंद अशी व्हावी की, शेतकऱ्यांच्या पतक्षमतेवर कोणताही नकारात्मक परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी मृत शेतकऱ्यांच्या प्रलंबित कर्जमाफीबाबत अद्याप शासनाकडून स्पष्ट मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या नसल्याची माहितीही बँकांकडून देण्यात आली. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, शासनाने यासंदर्भातील स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तातडीने जाहीर करावीत, अशी मागणी करण्यात आली. चर्चेदरम्यान बँकांनीही शेतकऱ्यांशी संवेदनशीलतेने वागून त्यांना अनावश्यक कागदपत्रे, विलंब किंवा त्रास न देता सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, हा विश्वास लाभार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक असल्याचेही सोनोने यांनी सांगितले.

# तेरवीचा खर्च टाळून गावातील शाळेला पाण्याची टाकी, फिल्टर व चिलर प्लांटची भेट

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**मलकापूर :** आजीच्या तेरवीचा उहापोह न करता तेरवीच्या कार्यक्रमाला होणारा खर्च गावातील शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शुध्द व थंड पाणी वितरीत करणारी पाण्याची टाकी व पाणी शुध्दीकरण प्लांट देवून वरखेड येथील तायडे परिवाराने सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. वरखेड येथील माजी सरपंच निवृत्ती तायडे यांच्या आई व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, इंजि.सचिन तायडे यांच्या आजी प्रभावतीबाई तायडे यांचे ३१ जुलै रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी निधन झाले होते. तायडे परिवार मराठा सेवा संघाच्या विचारसरणीचा असून बहुजनांच्या मुलांनीही शिकून मोठे व्हावे या सेवासंघाच्या विचारातून प्रेरीत होत त्यांनी आपल्या आजीचा तेरवीचा कार्यक्रम हा परंपरेनुसार विधीवत फक्त भावबंदकीत करीत मोठे स्वरूप न देता साधेपणाने करून गावात असलेल्या जिल्हा परिषद शाळेत मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी टाकी उभारून त्यातून फिल्टर झालेले शुध्द व थंड पाण्याचे फिल्टर प्लॅन्ट भेट देत आजीच्या स्मृती कायम जपण्यासाठी पुढाकार घेतला आहे. १२ ऑगस्ट रोजी प्रभावतीबाईच्या तेरवीच्या दिवशीच वरखेड येथील शाळेत प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्यात येणार असून बांधकाम पुर्ण झाल्यानंतर शाळा व अंगणवाडीला शुद्ध पाण्याची टाकी व आरओ फिल्टर व चिलर प्लँट तायडे परिवाराच्या वतीने समर्पित करण्यात येणार आहे.

> माझे वडील व माझें सुद्धा प्राथमिक शिक्षण वरखेड येथील जिल्हा परिषद शाळेतच झाले आहे. कायम शिक्षणाप्रती जागृत असणाऱ्या माझ्या आजीच्या तेरवी निमित्त या शाळेला टाकी, फिल्टर व चिलर प्लॅन्ट देण्याचा योग आमच्या हातून घडत आहे, हे मी भाग्यच समजतो.
>
> **– इंजि. सचिन निवृत्ती तायडे**
>
> रा वरखेड ता.मलकापूर

# HMS-CCMP नोंदणीविरोधात IMA नांदुराचे बेमुदत सेवा बंद आंदोलन

## आपत्कालीन सेवा मात्र सुरू

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**नांदुरा:** . महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्र आणि आरोग्यसेवा व्यवस्थेशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) नांदुरा शाखेने गुरुवार (दि. ६ ऑगस्ट) पासून बेमुदत सेवा बंद आंदोलन सुरू केले आहे. यासंदर्भातील निवेदन पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय आणि संबंधित प्रशासनाला देण्यात आले.

IMA महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (MARD), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (ASMI) तसेच सर्व स्पेशालिस्ट राज्य संघटनांनी संयुक्तपणे या आंदोलनाची हाक दिली असून, नांदुरा शाखेनेही त्यास सक्रिय पाठिंबा दर्शविला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शासनाशी वारंवार सकारात्मक संवाद साधण्याचा प्रयत्न करूनही विशेषतः प्रस्तावित BHMS-CCMP नोंदणी प्रक्रिया, तसेच प्रस्तावित सेवा, प्रशिक्षण आणि कर्तव्यांबाबतच्या मागण्यांवर कोणतीही स्पष्ट भूमिका शासनाकडून घेण्यात आलेली नाही. या संदर्भातील नियामक चौकट आणि ठोस धोरणाचा अभाव असल्याने वैद्यकीय क्षेत्रात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. IMA च्या मते, या निर्णयामुळे वैद्यकीय व्यवसायाची नैतिकता, रुग्णांची सुरक्षितता, वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता आणि राज्यातील आरोग्यसेवेवरील जनतेचा विश्वास यावर दूरगामी परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून BHMS-CCMP नोंदणी प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी व सर्व संबंधित प्रश्नांवर लवकर तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

आंदोलनादरम्यान आपत्कालीन (Emergency) सेवा पूर्ववत सुरू ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, नियमित (Elective) व आपत्कालीन नसलेल्या (Non-Emergency) सर्व वैद्यकीय सेवा सकाळी ११ वाजल्यापासून बेमुदत बंद ठेवण्यात आल्या असून, शासनाकडून सकारात्मक निर्णय होईपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार असल्याचे IMA नांदुरा शाखेने स्पष्ट केले आहे. या निवेदनावर IMA नांदुरा शाखेचे अध्यक्ष डॉ. नितीन नांदुरकर, सचिव डॉ. स्वप्नील वाघ आणि खजिनदार डॉ. अर्शद खान यांच्या स्वाक्षऱ्या असून, प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार मार्कंड साहेब यांनी निवेदन स्वीकारले आहे.

# जांबुळधाबा येथे अवैध देशी दारुविक्री वर कारवाई

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**मलकापुर :** मलकापूर ग्रामीण पोलिसांनी जांभबुळधाबा येथील बसस्थानकाजवळ कारवाई करून अवैधरीत्या देशी दारूची विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत पोलिसांनी ५४० रुपये किमतीच्या देशी दारूच्या सहा बाटल्या जप्त केल्या. मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप दामु चव्हाण (वय ५४, रा. जांबुळधाबा, ता. मलकापूर) हा ६ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास जांबुळधाबा बस स्टॉपजवळ अवैधरीत्या देशी दारूची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई केली. यावेळी त्याच्या ताब्यातील वायरच्या थैलीची तपासणी केली असता टॅन्गो पंच कंपनीच्या १८० मिलीच्या सहा बाटल्या, प्रत्येकी ९० रुपये किमतीच्या, असा एकूण ५४० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. याप्रकरणी पोलीस शिपाई शेख युसूफ शेख इस्माईल यांच्या फिर्यादीवरून मलकापुर ग्रामीण पोलीस ठाण्यात अप. नं. १५७/२०२६, कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास म.पो. हे.कॉ सविता मोरे करीत असून, गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही म.पो.हे.कॉ निता मोरे यांनी केली.

# पोटखराब' नोंद नको; शेती पूर्ववत करण्यासाठी पॅकेज द्या

## शिंदेसेनेचे जळगाव जामोद तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**जळगाव जामोद :** तालुक्यात महापुरामुळे शेती खरडून गेल्याच्या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त जमिनीची 'पोटखराब वर्ग (अ)' म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया तत्काळ स्थगित करावी, तसेच शेती पूर्ववत करण्यासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महापुरामुळे अनेक शेतकऱ्यांची दोन ते पाच एकरांहून अधिक शेती खरडून गेली आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये वाळू, गाळ, दगड व मुरूम साचल्याने जमीन लागवडीस अयोग्य झाली आहे. अशा परिस्थितीत शासनाने यासंदर्भात स्पष्ट धोरण जाहीर करावे, पुनर्संचयित होऊ शकणाऱ्या जमिनींची 'पोटखराब वर्ग (अ)' म्हणून नोंद टाळावी, तसेच अशा नोंदीमुळे भविष्यात शासकीय योजनांच्या लाभांवर काय परिणाम होणार आहे, याबाबत अधिकृत लेखी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. 'पोटखराब वर्ग (अ)' म्हणून नोंद करणे योग्य ठरणार नाही, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. नुकसानग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी करूनच जमिनीची नोंद करावी, अशी मागणीही केली आहे. निवेदनावर जिल्हाप्रमुख संतोष पाटील, वसंता मिरगे, संजय भुजबळ, जिल्हा उपसंघटक वासुदेव राजनकर, युवा उपजिल्हाप्रमुख प्रकाश भिसे, गजानन देशमुख, बाळू पाटील, राजेंद्र परिहार, अशपाक देशमुख व विलास दातीर यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# दारुच्या नशेत जावयाचा सासूला त्रास; मुलाच्या डोक्यात कडे मारुन जखमी

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**खामगाव :** दारूच्या व्यसनाला कंटाळून माहेरी राहणाऱ्या पत्नीचा शोध घेत सासूच्या घरी गेलेल्या जावयाने सासूला अश्लील शिवीगाळ करीत धमकावल्याची घटना खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुऱ्हा येथे ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली. यावेळी मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या सासूच्या मुलाच्या डोक्यात हातातील कडे मारून त्याला जखमी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. कुऱ्हा पारखेड येथील ५० वर्षीय महिलेची मुलगी पतीच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून सध्या आईकडे राहत आहे. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता आरोपी गोविंदा देविदास वाकोडे (३८) रा. पिंप्री देशमुख, ता. खामगाव हा कुऱ्हा येथील फिर्यादीच्या घरासमोर आला. त्याने पत्नी कुठे आहे, अशी विचारणा करीत फिर्यादीशी वाद घातला. यावेळी त्याने फिर्यादीचा हात धरून अश्लील भाषेत शिवीगाळ व धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. हा प्रकार सुरू असताना फिर्यादीचा मुलगा योगेश धुरंदर हा आरोपीला समजावण्यासाठी आला. त्यावेळी आरोपीने हातातील कडे योगेशच्या डोक्यात मारल्याने तो जखमी झाला. तसेच त्यालाही शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५, ११८ (१) व २९६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# 'मिशन परिवर्तन' अंतर्गत सोनाळा पोलीस ठाणे हद्दीत दामिनी पथकाकडून विद्यार्थिनींमध्ये सुरक्षा जनजागृती

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**बुलढाणा:** जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांच्या संकल्पनेतून जिल्हाभर राबविण्यात येत असलेल्या "मिशन परिवर्तन" या उपक्रमांतर्गत आज सोनाळा पोलीस ठाणे हद्दीत दामिनी पथकाने टुणकी व सोनाळा येथील संत सोनाजी महाराज विद्यालय व जिल्हा परिषद सरकारी शाळा मुलींची शाळांना भेटी देऊन विद्यार्थिनींसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थिनींशी संवाद साधत महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. मुलींची छेडछाड, पाठलाग (STALKING), सोशल मीडियावरील फसवणूक व गैरवापर, सायबर गुन्हे, महिलांवरील अत्याचार, 'गुड टच' आणि 'बॅड टच', तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (POCSO) कायद्याबाबत विद्यार्थिनींना सोप्या भाषेत माहिती देण्यात आली. तसेच कोणत्याही प्रकारचा त्रास, धमकी किंवा संशयास्पद प्रकार घडल्यास भीती न बाळगता तात्काळ पालक, शिक्षक किंवा पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, तसेच महिला हेल्पलाईन 1091 व आपत्कालीन सेवा डायल 112 क्रमांकांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले.

दामिनी पथकाने त्यांच्या शंकांचे निरसन करत स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहणे, आत्मविश्वास वाढविणे आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठविण्याचा संदेश दिला. "मिशन परिवर्तन" या उपक्रमाचा उद्देश महिलांमध्ये व मुलींमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, पोलिसांबद्दल विश्वास दृढ करणे आणि सुरक्षित व भयमुक्त समाजाची निर्मिती करणे हा आहे. या अनुषंगाने जिल्हाभर अशा जनजागृती उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम सोनाळा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथक प्रमुख महिला पोलीस हवालदार प्राजक्ता चिमकर, अर्चना मते, सोळंके पो कॉ राहुल पवार, संदीप सुसर, इमरान शेख ने यशस्वीरीत्या पार पाडला. शिक्षकांनीही या उपक्रमाचे स्वागत करून विद्यार्थिनींसाठी अशा कार्यक्रमांची व पेट्रोलिंग ची गरज व्यक्त केली.

# ठाणेदारांच्या आवाहनाला टुणकीवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद शिवभक्त कावड मंडळाच्या वतीने 50 जणांचे रक्तदान

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**संग्रामपूर :** धार्मिक उत्सवांना सामाजिक बांधिलकीची जोड देण्याच्या पोलीस ठाणे सोनाळ्याचे ठाणेदार संदीप काळे यांच्या संकल्पनेला टुणकीवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याच अनुषंगाने टुणकी येथील शिवभक्त कावड मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. पोलीस ठाणे सोनाळ्याचे ठाणेदार संदीप काळे यांनी सामाजिक व धार्मिक मिरवणुकांना परवानगी घेण्यापूर्वी पाच झाडांचे वृक्षारोपण करणे, तसेच धार्मिक कार्यक्रमांसोबत समाजाचेही काही देणे लागते या उदात्त हेतूने रक्तदान शिबिर, स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन केले आहे. विविध मंडळे व नागरिकांना ते सातत्याने या उपक्रमाबाबत मार्गदर्शन व प्रोत्साहन देत आहेत. ठाणेदार संदीप काळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत टुणकी येथील शिवभक्त कावड मंडळाने वृक्षारोपण व रक्तदानाचा संकल्प हाती घेतला. त्यानुसार आज टुणकी बसस्थानक येथे सईबाई मोटे शासकीय रुग्णालय, शेगाव येथील रक्तपेढीच्या पथकाच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात कावड मंडळाचे सदस्य, युवक व ग्रामस्थ अशा एकूण ५० जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. विशेष म्हणजे, रक्तदान शिबिराची सुरुवात ठाणेदार संदीप काळे यांनी स्वतः प्रथम रक्तदान करून केली. त्यांच्यासोबत पोलीस कर्मचारी संदीप पवार व परमेश्वर तितरे यांनीही रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण निर्माण केले. यावेळी ठाणेदार संदीप काळे यांनी "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते. धार्मिक व सामाजिक उत्सव केवळ उत्सव न राहता त्यांना समाजोपयोगी कार्याची जोड मिळाली पाहिजे," असे आवाहन केले. दरम्यान, शिवभक्त कावड मंडळाच्या सदस्यांनी पुढील आठवड्यात टुणकी गावात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवत कावड मंडळाने घेतलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

# वन परिक्षेत्रातून रेतीचे अवैध उत्खनन!

## ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त; एकाविरुद्ध वनगुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**खामगाव :** पूर्व कोथळी बीटमधील राखीव वनक्षेत्रातून रेतीचे अवैध उत्खनन करून वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर खामगाव वनविभागाच्या फिरत्या पथकाने शनिवारी, ८ ऑगस्ट रोजी धडक कारवाई केली. या कारवाईत रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडून ६ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मोताळा वनपरिक्षेत्रांतर्गत वनखंड क्रमांक ५०४ मधून रेतीचे अवैध उत्खनन सुरू असल्याची माहिती फिरते पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार कारवाई करण्यात आली.ही कारवाई खामगाव फिरते पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यु. आर. राऊत, पोलिस हेडकॉन्स्टेबल सुनील जाधव, वनरक्षक आर. जी. अढाव व वाहनचालक रोहिदास आडे यांनी केली. उपवनसंरक्षक जमीर मुनीर शेख, विभागीय वन अधिकारी कमलेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक वैभव काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. साहित्यसाठा जप्त पथकाने सापळा रचून ट्रॅक्टर क्रमांक एमएच २८ सीसी ३८६३ पकडला. ट्रॅक्टरमध्ये ६० घनफूट रेती आढळून आली, तसेच तीन टोपले, तीन फावडे आणि लोखंडी चाळणी असा साहित्यसाठाही जप्त करण्यात आला. याप्रकरणी हमीद शहा हारून शहा (रा. कोथळी, ता. मोताळा) याच्याविरुद्ध विविध कलमान्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# नियमबाह्य पार्किंगमुळे नागरिकांना मनस्ताप

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** शहरातील मुख्य मार्गावरील अतिक्रमण काढून शहरातील रहदारी सुरळीत करण्याचा प्रयत्न आहे. परंतु विविध रस्त्यावर नियमबाह्य पार्किंगमुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो आहे. शहराच्या विविध भागातील हा प्रश्न आहे. मनाला येईल तिथे वाहने उभी केली जातात. या वरून वाद होतात. मात्र, समस्या दूर होत नाही हे दुर्दैव आहे.



सिटी कोतवाली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह, गांधी चौक ते ताजनापेठ पोलिस चौकी, सिटी कोतवाली ते मंगलदास मार्केट या भागात ग्राहकांना दुकाना समोर वाहन उभे करून खरेदी करावी लागते. तसेच आधीच वाहने उभी असली तर सुरक्षित जागा सापडत नाही. येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होते. एखादे मोठे वाहन उभे राहिले तर जॅम लागतो. काही क्षणात शेकडो वाहने उभी राहतात. अकोला शहरात अजूनही पार्किंग झोन नाही. महापालिकेच्या आमसभेत विविध प्रश्न उपस्थित होतात. परंतु जणु काय आलबेल असल्या प्रमाणे नियमबाह्य पार्किंगकडे कोणी लक्ष देत नाही. मूळ मुद्दे किंवा जनतेला ग्रासत असलेल्या ज्वलंत मुद्यावर चर्चा होत नसेल तर काही उपयोग नाही अशी भावना व्यक्त होत आहे.

### शहर वाहतूक समस्या सोडवावी लागेल

» शहरातील अनियंत्रित वाहतूक समस्या ठीक करण्यासाठी पावले उचलावी लागणार आहे. कारण जनतेला रामभरोसे सोडणे योग्य नाही. पोलिस प्रशासन, महापालिका आणि आरटीओ विभागाच्या समन्वयातून मार्ग काढावा लागेल. त्याशिवाय तरणोपाय नाही.

# कार झाडावर आदळली; युवक जागीच ठार

## यवतमाळ-नेर मार्गावरील अपघात, दोन मित्र बचावले

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**यवतमाळ :** नेरकडे भरधाव वेगाने जात असलेली कार अनियंत्रित होऊन झाडावर आदळल्याने झालेल्या भीषण अपघातात चालक युवकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी (९ ऑगस्ट) पहाटे साडेतीनच्या सुमारास यवतमाळ-अमरावती मार्गावरील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वळणावर घडली. ईश्वर नेवारे (रा. नेर) असे मृत युवकाचे नाव आहे. ईश्वर नेवारे हे त्यांच्या एमएच १५ डीसी २५०३ क्रमांकाच्या कारने नेरकडे जात होते. कारमध्ये त्यांच्यासोबत अन्य दोन मित्रही होते. जवाहरलाल दर्डा इंजिनिअरीग कॉलेजच्या वळणार भरधाव कार अचानक अनियंत्रित होवून रस्त्यालगतच्या झाडावर जोरदार आदळली. धडक इतकी भीषण होती की, ईश्वर यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच लोहारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी कारमधून मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविला. या अपघातात कारमधील अन्य दोन युवक सुदैवाने बचावले. या प्रकरणी लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.





## महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त वृक्षारोपण

**अकोला :** क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त शुक्रवारी टिळक राष्ट्रीय शाळा मोठी उमरी अकोला येथे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व साऊ एकल समिती अकोला च्या वतीने, वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी समता परिषदेच्या विदर्भ विभागीय अध्यक्ष माया इरतकर, जेष्ठ मार्गदर्शक उमेश मसने, महिला जिल्हाध्यक्ष ज्योती निखाडे, अनिता काळबांडे,संगीता निखाडे, तुषार हांडे, सुरेश हाडोळे, सुरेश उमाळे, सुनिल वनारे, अॅड. शितल राऊत, ममता जेरपोतवार आदी उपस्थित होते.

# धनादेश अनादरप्रकरणी दोघांना सहा महिन्यांची कैद

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** धनादेश अनादर प्रकरणात येथील आठवे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषी ठरवत प्रत्येकी सहा महिन्यांची साधी कैद आणि १५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आणखी दोन महिन्यांची साधी कैद भोगावी लागणार असल्याचे न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे. हा निकाल ६ ऑगस्ट रोजी सुनावण्यात आला.

कलम १३८ अंतर्गत हे प्रकरण दाखल करण्यात आले होते. सरकारी दूध डेअरीसमोर, मूर्तिजापूर रोड, अकोला येथील भतीजा लिकर्स यांनी सी.एस. पाटील कंट्री लिकर शॉपचे भागीदार अशोक श्यामराव पाटील आणि चमेलीबाई श्यामराव पाटील, रा. रावेर, जि. जळगाव यांच्याविरुद्ध धनादेश अनादरप्रकरणी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणाची सुनावणी अकोला येथील आठवे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात झाली.

सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या पुरावे व कायदेशीर बाबींचा विचार केल्यानंतर न्यायालयाने दोन्ही आरोपींना कलम १३८ अंतर्गत दोषी ठरविले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना प्रत्येकी सहा महिन्यांची साधी कैद तसेच १५ लाख रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास आणखी दोन महिन्यांची साधी कैद भोगावी लागणार आहे. या निकालामुळे धनादेश देऊन तो अनादरित झाल्यास संबंधित व्यक्तीला कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. धनादेश व्यवहारात कायदेशीर जबाबदारीचे पालन न केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, असा संदेश या निकालातून मिळाला आहे. या प्रकरणात फिर्यादी भतीजा लिकर्स यांची बाजू अॅड. अ. द. निंबाळकर यांनी न्यायालयात मांडली.

# लिनेस क्लब ऑफ अकोला तर्फे पवित्र आषाढ महिन्याच्या पावन पर्वावर 11 ऑगस्टला मासिक सभा

प्रतिनिधी ९ ऑगस्ट





**अकोला :** लिनेस क्लब ऑफ अकोला कडून पवित्र आषाढ महिन्याच्या पावन पर्वावर ११ ऑगस्टला सायंकाळी ४ वाजता हॉटेल सेंटरप्लाझा येथे कार्यक्रम आयोजित केला आहे. लिनेस क्लबच्या प्रांताध्यक्षा लि. कल्पनाजी देशमुख, रीजन चेअरपर्सन लि. ममताजी सूर्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

प्रांत सचिव लि. रिंकू जी खंडेलवाल व प्रांत कोषाध्यक्ष लि. शीतल अग्रवाल यांचे देखील आगमन होत आहे. क्लबचे कार्य व सेवा उपक्रमांचे मूल्यमापन करणे हा या मागील उद्देश आहे. या मासिक सभेच्या आयोजनाची जबाबदारी व स्वागत दायित्व लि. रत्नमाला रुईकर, लि. राजश्री देशमुख, लि. दिव्या देशमुख, लि. इंद्राणी देशमुख, लि. दिना शाह, लि. अरुंधती शिरसाट या सांभाळतील. क्लबच्या अध्यक्ष लि. राजश्री समनपुरे (जयसवाल), सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्ष लि. अलका उमाळे उपस्थित राहतील.

या कार्यक्रमासाठी माजी प्रांताध्यक्षा, माजी अध्यक्षा व सर्व लिनेस सभासद यांना जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दुकानाच्या मालकीवरुन वाद; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** सिटी कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीतील मंगलदास मार्केट परिसरातील वखारिया कॉम्प्लेक्समध्ये दुकानाच्या मालकीवरून वाद असून, पाच लाख रुपये देण्याची मागणी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी कच्ची खोली, सिंधी कॅम्प येथील मयुर प्रकाश सैनानी (२५) यांच्या तक्रारी वरुन सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सैनानी यांच्या तक्रारीनुसार, त्यांनी १३ सप्टेंबर २०२४ रोजी मंगलदास मार्केटमधील वखारिया कॉम्प्लेक्स येथील नझूल सिटी सर्व्हे क्रमांक ३८ बी, प्लॉट क्रमांक ५२/२ मधील दुकान खरेदी केले असून, मालमत्ता स्वतःच्या नावावर करण्यासाठी महापालिकेत अर्ज केला आहे. दुकानाची दुरुस्ती करण्यासाठी ते ७ जून रोजी वडील व भावासह गेले असता जैद अहमद नसीर अहमद शेख व उजेर अहमद नसीर अहमद शेख यांनी जागा आपली असल्याचे सांगत पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. पैसे न दिल्यास महागात पडेल, दुकानात पाऊल ठेवले तर जीवे मारू, तसेच दुकान चालविल्यास गुंड पाठवून नुकसान करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, १० जून रोजी दुकान उघडून पाहिले असता पूर्वेकडील अंदाजे चार बाय सात फूट भिंत तोडलेली आढळली. चौघांनीच भिंत तोडल्याचे सांगितल्याचा दावा सैनानी यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता विविध कलमानुसार गुन्हा नोंदवला आहे. सिटी कोतवाली पोलिस तपास करीत आहेत.

# गाडगेनगर पोलिसांनी 59 मोबाईल परत केले

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अमरावती :** पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर येथे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. माहे मे-जुन-जुलै मध्ये तक्रारदारांचे ५९ मोबाईल ज्याची किंमत ११,८०,००० रू. आहे अशा सर्व मोबाईलचा शोध घेण्यात डी.बी. पथक यशस्वी झाले. तक्रारदारांना ०७ ऑगस्ट रोजी पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके , सहा. पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे गाडगेनगर विभाग अमरावती, पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या यांचे हस्ते मोबाईल परत करता आले. संबंधितांनी समाधान व्यक्त केले. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विजया पंधरे व प्रशासन निरीक्षक प्रमोद पाचकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गाडगेनगर डी. बी. पथकातील उपनिरीक्षक सागर ठाकरे, पोलीस अंमलदार-अशोक वाटाणे, मनीष सावरकर, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिध्दार्थ श्रृंगारे व सचिन गौरखेडे यांनी केली आहे.



# कामिका एकादशी निमित्त विठ्ठल मंदिरात 'गजर विठूचा'

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** जुने शहरातील पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कामिका एकादशी निमित्त आज सायंकाळी ५ वाजता कीर्तनकार हभप संतोष महाराज पिसे यांच्या वाणीतून संगीतमय नामजप यज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच कामिका एकादशी पर्वावर विविध धार्मिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. मंदिरात दर्शनासाठी भाविकांची सकाळ पासून गर्दी होती. ३२२ वर्ष प्राचीन श्री विठ्ठल मंदिरात ९३ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. ९ दशकांपासून अखंड हरिनाम सप्ताहात अहोरात्र प्रहारकरी विठ्ठनामाचा जप करीत असतात. तसेच आषाढीला पहाटेपासूनच भजनी मंडळ विठ्ठलस्तूती, दिवसभर महिला मंडळांची भजने तसेच भक्तीसंध्येचे आयोजन करण्यात येत असते. सायंकाळी नित्य हरिपाठ आणि रात्रीच्या सत्रात राज्यातील प्रख्यात कीर्तनकारांचे कीर्तन असा योग साधला आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती स्थापना वर्धापन दिनाचा १३२ वा सोहळा, विठ्ठल मंदिर एकादशी महारथी मंडळाचा २८ वा वर्धापन दिन आणि श्री विठ्ठल परिवार, अकोलाचा १० वा वर्धापन दिन असा त्रिवेणी योग यंदा साधला आहे. या मंगलमय पर्वावर 'गजर विठूचा' हा भावपूर्ण व संगीतमय श्री विठ्ठल नामजप यज्ञ रविवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला आहे. भावपूर्ण नामजप यज्ञात सहभागी होऊन 'गजर विठूचा' सोहळ्यात सर्व विठ्ठलभक्तांनी रविवारी सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, येथे मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



# ओव्हर लोड स्कूल ऑटोवर वाहतूक विभागाची कारवाई




प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** आर आर सी न्यूज ने शहरातील ऑटोमधील ओव्हरलोड विद्यार्थ्यांची वस्तूस्थिती दाखवल्यानंतर शनिवारी शहरातील विविध शाळांच्या बाहेर ओव्हरलोड ऑटो चालकांवर कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रसारीत या बातमीचे पालकांनी स्वागत केले आहे. जठारपेठ, अग्रेसन आणि जुना इनकम टॅक्स चौकात शाळकरी मुलांची जीवघेणी ऑटो वाहतूक आज नियंत्रणात आली. अकोला शहरात वाहतूक पोलिसांनी आज विद्यार्थ्यांच्या हितासाठी ओव्हरलोड विद्यार्थी नेणाऱ्या ऑटोवर कारवाई करत ताकीद दिली.शहरातील विविध मार्गावर दररोज क्षमतेपेक्षा जास्त शाळकरी मुलांना कोंबून बेकायदेशीर ऑटो धावत आहेत. निष्पाप विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात असतानाही या ओव्हरलोड आणि अवैध ऑटोंवर कोणतीही कारवाई होत नव्हती. आज ऑटोवर कारवाई सुरु करण्यात आली असून यामुळे ऑटो चालक विद्यार्थ्यांची कोंबून वाहतुक करणार नाही अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# शिरपूर ते मालेगांव मार्गावर दोन ऑटोंचा भीषण अपघात, चार जण जखमी !

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**वाशिम :** शिरपूर ते मालेगांव मार्गावर प्रवाशी ऑटो आणि माल वाहू ऑटो मध्ये भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये चार जण जखमी झाले असून दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.अपघाततमुळे या मार्गावरील वाहरुक काही काळ विस्कळीत झाली होती. वाशिम जिल्ह्यातील शिरपूर-मालेगाव मार्गावर तीनचाकी प्रवासी ऑटो आणि मालवाहतूक ऑटोमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना आज सकाळी घडली. या अपघातात प्रवासी ऑटोमधील चार प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यापैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे पाठविण्यात आले आहे. या भीषण धडकेत प्रवासी ऑटोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, ऑटोचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत पुढील कारवाई सुरू केली आहे.अपघातामुळेया मार्गावर काही काळ वाहतुक विस्कळीत झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.हा अपघात नेमका कशामुळे झाला याचा पुढील तपास पोलीस करीत आहे.



# हिरकणी कक्षाची चावी चौकशी कक्षात !

## स्तनदा मातांनी कक्ष शोधायचा की चावी?

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**अकोला :** स्तनदा माता आणि त्यांच्या बाळांसाठी सुरक्षित व गोपनीय जागा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेला अकोला नवीन बसस्थानकातील 'हिरकणी कक्ष' कुलूपबंद असल्याचे समोर आले आहे. महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून आणि जिल्हा नियोजन समिती, अकोला यांच्या 3 टक्के निधीतून उभारण्यात आलेल्या या सुविधेचा प्रत्यक्ष लाभ गरजू महिलांना कितपत मिळतो, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, हिरकणी कक्षाच्या बाहेर लावलेल्या सूचनेनुसार या कक्षाची चावी चौकशी कक्षात उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सुविधा बंद नाही, तर चावी दुसऱ्या ठिकाणी आहे, असा विभागाचा दावा असू शकतो. मात्र, प्रवासाच्या घाईत असलेल्या किंवा बाळाला स्तनपान करण्याची तातडीची गरज असलेल्या महिलेने आधी चौकशी कक्ष शोधायचा, तेथे जाऊन चावी मागायची आणि त्यानंतर पुन्हा हिरकणी कक्षात यायचे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हिरकणी कक्षाचा उद्देशच स्तनदा मातांना सहज, सुरक्षित आणि सन्मानपूर्वक सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. अशावेळी कक्ष कायमस्वरूपी कुलूपबंद ठेवून त्याची चावी दुसऱ्या ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था कितपत योग्य आहे, याचा संबंधित विभागाने विचार करणे गरजेचे आहे. शासकीय निधीतून सुविधा उभारल्यानंतर तिचा प्रत्यक्ष वापर सुलभ होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कक्ष उभारला, फलक लावला आणि चावी चौकशी कक्षात ठेवली म्हणजे सुविधा उपलब्ध झाली का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.या कक्षासाठी किती निधी खर्च झाला, तो दिवसभर कोणत्या वेळेत उपलब्ध असतो, चावी देण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त आहे का आणि एखाद्या स्तनदा मातेला तातडीने कक्षाची गरज भासल्यास तिला तत्काळ प्रवेश मिळण्याची व्यवस्था काय आहे, याबाबत महिला व बालविकास विभागाने स्पष्टता देणे आवश्यक आहे.




# मजुरीच्या पैशांवरुन वाद; तरुणाच्या पोटात चाकू खुपसला!

## पिंपळगाव काळे येथील घटना; अकोल्यात उपचार सुरु

प्रतिनिधी ९ ऑगस्ट

**जळगाव जामोद :** मजुरीच्या पैशांच्या कारणावरून झालेल्या वादात २८ वर्षीय तरुणाने ४० वर्षीय तरुणाच्या पोटात चाकू खुपसल्याची घटना पिंपळगाव काळे येथे शनिवारी, ८ ऑगस्ट रोजी सकाळी घडली. या हल्ल्यात रामेश्वर देविदास बावस्कर (४०) गंभीररितत्या जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी अकोल्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अनिल बालिकराम उर्फ बाळू भगेवार (२८, रा. पिंपळगाव काळे) याचा शनिवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास रामेश्वर बावस्कर यांच्यासोबत मजुरीच्या पैशांवरून वाद झाला. यावेळी अनिल भगेवार याने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. वाद वाढल्यानंतर त्याने रामेश्वर यांच्या पोटात चाकू खुपसला. गंभीर जखमी अवस्थेत रामेश्वर यांना उपचारासाठी अकोल्याला हलविण्यात आले. या प्रकरणी सरला ओंकार बावस्कर यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक सचिन बागुल, पोलिस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे व तय्यब अली यांनी घटनास्थळाची पाहणी केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135